८ जून १९६८ । ४० पैसे

# माणूस



जागिये रघुनाथ कुँवर

समग्र साप्ताहिक
# माणूस

र्ष : आठवे : अंक : दुसरा
ार्षिक वर्गणी : वीस रुपये
शची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक : दिलीप माावकर, सौ निर्मला पुरंदरे

स. न. मे, २५

आपण सादर केलेल्याझी, ड्रॅगन, व्होल्गा व मॉंटीज डबल या लेखमालारच छान. पण २५ मेच्या अंकात जाहीर केलेल्या लेलेबद्दल माझी व्यक्तिशः नापसंती आहे. खटल्याच्यामाला प्रसिद्ध न करता नवीन विषयावरील लेखमाारू कराव्यात.

— ंवि. अर्धापूरकर, नांदेड.

स. न. मे, २१

'माणूस'वरील बडे गुलाअली यांचे चित्र सालकर यांनी फारच सुंदर रेखाटलेहे. तेंडुलकर यांची 'रातराणी'मधील बैठक त्य आपल्या विलक्षण शब्दफेकीने नुकतीच समोर असल्यासारखी रंगवली आहे. यक्षनगरीची उभारबेअंदाज जमली आहे. सध्या 'ग्यानबा' रजेवर आहे? त्याची गैरहजेरी चांगलीच जाणवते. — प्रकर परांजपे, शहापूर.

स. न. मे, २०

'माणूस' उत्तम. आजकालासिकाचे मुखपृष्ठ म्हणजे स्त्रीचे चित्र. परंतु बडे गुअलींचे चित्र देऊन त्या कलावंताबद्दल आपण जो आदाखवला त्याबद्दल धन्यवाद. —ं खडीकर, नांदेड.

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्काधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे क सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपो काल्पनिक आहेत.

मूल्य चाळीस पैसे
४१९ नारायण,
पुणे २
ध्वनी : ५७३५९



# सोमनाथ जंगलातल्या

'जागिये रघुनाथ कुंवर, पंछी बन बोले ।' या सुमधुर गीताने साऱ्या छावणीला पहाटे ४ च्या सुमारास जाग आणली जात आहे. 'सोमनाथच्या या भयाण व निबिड जंगलात आजवर जिथे वाघ अस्वलांचेच आवाज ऐकू येत असत तिथे श्रमिक कार्यकर्ता विद्यापीठाची (Workers university) ची वसाहत उभी करण्याचे प्रारंभीचे पाऊल म्हणून भारतातल्या एक हजार तरुणांची श्रमसंस्कार छावणी उभारलेली आहे. यासाठी बंगाल, उत्तरप्रदेश, गुजरात, कर्नाटक, गोमांतक, केरळ, महाराष्ट्र इ. विविध प्रांतांतून विद्यार्थी व विद्यार्थिनी आल्या आहेत. जंगलातली झाडे तोडून टाकलेल्या जमिनींना बांध घालून, दगडगोटे बाजूला काढून ही पडीक जमीन लागवड करण्यायोग्य बनवणार आहेत. अन्न-धान्याचे बाबतीतील भारताची लाचारी व परावलंबन दूर करून अन्न स्वावलंबनाचा प्रयत्न करणार आहेत. युगेयुगे मानवाच्या पदन्यासासाठी व सेवेसाठी आसुसलेली इथली धरती आपल्या श्रमिक पुत्रांना अनंत हस्तांनी अमाप पीक देणार आहे.

४ वाजता गाइलेल्या गीताने जाग आणली. सर्वजण ४। वाजता 'वन्दे मातरम्' हे राष्ट्रगीत सुरू होताच खाडकन आपापल्या जागी उभे राहून भारतमातेला अभिवादन करीत आहेत. ४ ते ५ प्रातर्विधी आटोपण्यात सारेजण गर्क आहेत. त्यासाठी खणलेल्या चरांच्या संडासांचा उपयोग ते करीत आहेत. तोंड धुण्यासाठी विहिरी खोदून पंपाने खेळवलेल्या पाण्याच्या नळांचा उपयोग करीत आहेत. त्यानंतर घंटा ऐकू येताच सर्वजण शिस्तीनं भोजनगृहाकडे धाव घेत आहेत. पाळीने उभे राहून नाश्ता घेत आहेत. काही आमच्यासारखे सवयीचे गुलाम कँटीनतर्फे विकल्या जाणाऱ्या चहा–कॉफीच्या रांगेत उभे आहेत ! स्वातंत्र्यपूर्व काळातल्या सेवा-

**प्रा. चंद्रकांत पाटगावकर**

# श्रमसंस्कार छावणीतून

दलाच्या शिबिरातून चहा–कॉफ़ीचा मज्जाव असे. फक्त कांजी दिली जात असे! त्यामुळे हा नवा बदल सुखद व कालानुरूप स्वागतार्ह वाटत आहे!

५॥ वाजता सर्वजण आपापल्या तंबूसमोर गटागटाने उभे आहेत. लाऊडस्पीकर वरून आजच्या श्रमदानाच्या कार्याबद्दल सूचना दिल्या जात आहेत. त्याप्रमाणे क्रमाक्रमाने सर्वजण कोठारातून फावडी, कुदळी, कुऱ्हाडी, घमेली, पहारी इ. साधने घेऊन श्रमदानाच्या जागेवर चालले आहेत. गटातील विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार फुटांनी मोजून बांध बांधण्याची कामे सोपवून दिली जात आहेत. ६ वाजता श्रमदानाला प्रारंभ होत आहे. लोखंडी नांगराने कठीण जमीन उकरून दिली जात आहे. सर्व-जण रांगेत उभे राहून खाली ढेकळे व वर माती असा शेतांना बांध घालीत आहेत. पाया ५॥ फूट रुंद व ऊंची ३॥ फूट असे हे बांध एकमेकांशी समांतर तयार केले जात आहेत. तोडलेल्या झाडांचे बुंधे आणि जमिनीत पसरलेल्या मुळ्या काही-जण कुऱ्हाडीने तोडीत आहेत. यापूर्वी तोडलेल्या काटेरी झुडपांचे व काटक्यांचे ढीग करून कुणी त्यांना आग लावीत आहेत. जमिनीत मोठमोठे दगड, गोल गोटे निघत आहेत ते गोळा करून त्यांचे ढीग करण्याचे काम विशेषत: लहान विद्यार्थी व शिबिरातील सर्व स्त्रिया करीत आहेत.

आता ८ वाजले आहेत. सकाळी ६ पासून आतापर्यंत दोन तास केलेल्या श्रमा-मुळे थकवा आला आहे. थोडी विश्रांती सर्वांनाच हवी आहे. कुणाला तहानही लागली आहे. पाण्याच्या गाडीकडे सर्वांचे डोळे चातकासारखे लागले आहेत. श्रमकार्याच्या जागेवर सर्वांना पाणी दिले जात आहे. थोडा वेळ सामूहिक गीते म्हणण्याचा अथवा शेर–शायरीचा कार्यक्रम कुठं कुठं होत आहे. विश्रांती घेऊन व

पाणी पिऊन ताजेतवाने झालेले सर्वजण पुन: जोमाने कामाला लागले आहेत. १० वाजेपर्यंत बांध बांधण्याचे काम पूर्ण झाले आहे. मुंबई–पुण्याकडचे काही विद्यार्थी ज्यांना श्रमाची यापूर्वी मुळीच सवय नव्हती ते फारच थकून गेले आहेत. सूर्य वर येऊन आता उन्हे फार कडक जाणवू लागली आहेत. परतताना सर्वजण आपापली श्रमाची साधने, खोरी, फावडी इ. खांद्यावर टाकूण श्रमगीत गात गात परत येत आहेत.

एक साथ एक साथ
करो करो श्रम एक साथ
चलो चलो सब सोमनाथ
एक साऽऽथ

आमच्यापैकी काहीजण, ज्यांना यापूर्वी शेतीच्या नित्य श्रमकार्याची सवय आहे, पीसवर्क पद्धतीने काम खंडून घेऊन शेतें स्वतः कुदळी, पहारीने खणून बांध घालण्याचे काम करीत आहेत. त्यांना पैशात मोबदला दिला जाणार आहे. त्यातून ते आपल्या श्रमशिबिरातील जेवणाच्या खर्चाचे पैसे भागवणार आहेत व उरलेल्या पैशाचे दान ते वरोरा–आनंदवनला देणार आहेत ! आमच्यासारख्या बाकीच्या असंख्य तरुणांच्या श्रमकार्यातून रोजच्या जेवणाचा खर्च भागण्याइतकीही मजुरी मिळणार नसल्यामुळे त्यांच्या जेवणाच्या खर्चाचा भार आनंदवनाच्या महारोग्यांनी दिलेल्या बाबांच्या शब्दांत बोलायचे म्हणजे 'सबसिडीतून होणार आहे !' या विशाल व भारतीय श्रमशिबिराचा उद्देश व नामकरण ही श्रम–संस्कार छावणी आहे ! अशा या छावणीत विद्यार्थ्यांप्रमाणे प्राध्यापक, डॉक्टर, सरकारी नोकर, शिक्षक व समाजसेवकही सामील झाले आहेत. बाबा म्हणतात त्याप्रमाणे आनंदवन ही शारीरिकदृष्ट्या पंगू मानवांना समर्थ बनवणारी प्रयोगभूमी आहे तर सोमनाथ श्रमसंस्कार छावणी ही मानसिकदृष्ट्या पंगू समाजाला समर्थ बनवणारी श्रमिक कार्यकर्त्यांची युनिव्हर्सिटी आहे !'

१०॥ ते ११॥ पर्यंत सर्वजण स्नान करण्यात मग्न आहेत. विज्ञानयोगी बाबांनी पंपाने विहिरीतून खेचलेल्या पाण्याच्या नळीतून सोमनाथच्या या जंगलातही उभारलेल्या शॉवर बाथचा आनंद काहीजण लुटीत आहेत. तर काहीजण निसर्गतः घो घो धावणाऱ्या धबधब्यात ओढ्यातील 'तीन कुंडा'त मनसोक्त डुंबत आहेत. गर्द वनराईने वेढलेल्या व विनटलेल्या त्या निसर्गरम्य व प्रशान्त ठिकाणी तास न् तास बसण्याचा मोह सर्वांनाच होत आहे. परंतु आता पोटात कावळे ओरडू लागल्याने सर्वजण पहिल्या पंगतीला नंबर लावण्यासाठी भोजनगृहाकडे धाव घेत आहेत !

भोजनाचे सर्वांनाच समाधान आहे. शिबिराचे अर्धे यश सामान्यतः तिथे मिळणाऱ्या जेवणावर अवलंबून असते, असा आमचा आजवरचा अनुभव आहे. त्या दृष्टीने शिबिरास येताना विद्यार्थ्यांना आम्ही साध्या जेवणाची म्हणजे भात नसलेल्या

जेवणाचीच कल्पना दिली होती ! परंतु इथे चपाती, भात, बटाटे-भोपळे यांची भाजी, आमटी अन् कांदे इ. साधेसुधे पण सकस अन्न मिळत आहे, त्यामुळे सर्वजण संतुष्ट आहेत. यांपैकी बरेचसे अन्न इथे सोमनाथच्या शेतात व आनंदवनात निर्माण झालेले आहे.

दुसरी पंगत, तिसरी पंगत होऊन सर्व हजारच्या हजार शिबिरार्थींची जेवणे १।। पर्यंत आटोपली आहेत आणि १।। ते ३।। दोन तास सर्वजण आपापल्या निवासस्थानी विश्रांती घेत आहेत. कुणी झाडीच्या छायेत पहुडले आहेत. कुणी पत्र लिहीत आहेत तर कुणी बाबांची 'ज्वाला आणि फुले', 'वर्कर्स युनिव्हर्सिटी' इ. पुस्तके वाचण्यात गर्क आहेत. बाहेर दुपारची उन्हे रणरणत आहेत. ११० ते ११२ पर्यंत उष्णतामान रोज चढत आहे. जिवाची तगमग सहन होत नाही. सोमनाथचे थंडगार पाणी हाच एकमेव आधार वाटत आहे. सुंदर, स्वच्छ, मधुर अन् शीतल पाणी ! कितीही प्याले तरी आणखी प्यावे असे वाटत आहे. संस्कृतमध्ये पाणी या शब्दाला 'जीवन' असाही प्रतिशब्द का वापरला जातो, त्याची सार्थकता अनुभवास येत आहे!

या दुपारच्या २ ते ३।। च्या वेळेचा उपयोग विविध कार्यक्रमांत रस घेणारे निवडक कार्यकर्ते करून घेत आहेत. युक्रांद (युवक क्रांतिदल), राष्ट्र सेवादल इ. संघटना आपापल्या संस्थेचे उद्देश, कार्य यांचा परिचय करून देत आहेत आणि परस्पर परिचय करून घेत आहेत. पू. सानगुरुजींच्या आंतरभारतीचा परिचय सर्वांना करून देण्याच्या दृष्टीने 'आंतर–भारती' संमेलनही होत आहे. या शिबिरास कर्नाटक, गोमंतक, गुजरात, मध्यप्रदेश, महाराष्ट्र इ. राज्यांतून तरुण आले आहेत. त्यांना आंतर–भारतीच्या कार्याची कल्पना देण्यात येत आहे. सर्वांमध्ये या संस्थेबद्दल उत्सुकता निर्माण होऊन राहिली आहे. बुकस्टॉलवर ठेवलेल्या सेवादल, युक्रांद इ. संस्थांच्या वाङ्मयावरोबरच 'आंतर–भारती' या पत्रिकेचे अंकही सर्वजण आवडीने खरेदी करीत आहेत.

या विविध संस्था आणि प्रवृत्ती यांमध्ये समन्वय व सहकार्य साधण्यासाठी "युप्रस" (युवक प्रगती सहयोग) ही नवीन संस्था काय काय प्रयत्न व उपक्रम करीत आहे याचीही चर्चा चालू आहे. या चर्चेत ठिकठिकाणी चालू असलेल्या 'धडपडीचे' व सामाजिक सेवा कार्याचे वर्णन व अनुभव ठिकठिकाणचे कार्यकर्ते करीत आहेत. त्यामधून नवनवीन सूचनाही पुढे येत आहेत. हे सोमनाथ शिबिर संपवून आपापल्या ठिकाणी परत गेल्यानंतर काय काय अभिक्रम, उपक्रम आणि कार्यक्रम करता येतील व करणे आवश्यक आहे याची योजना तयार होत आहे. या योजनेचे मार्गदर्शन व संचालन युप्रसतर्फे यापुढे करण्यात यावे अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. डॉ. देऊळगावकर यांनी गुलबर्गा येथे येत्या दिवाळीत शिविर घेण्याचे ठरवले आहे. त्याचे सर्वजण स्वागत करीत आहेत. तसेच येते वर्ष महात्मा गांधी जन्मशताब्दीचे असल्याने त्यासंबंधीची श्री. मामा क्षीरसागर यांनी

दिलेली माहिती ऐकून त्यापैकी काहीजण काहीतरी कार्यक्रम आपापल्या ठिकाणी अमलात आणण्याचे संकल्प करीत आहेत.

आता ३॥ वाजले आहेत. ४ पर्यंतच कॅन्टीन उघडे राहणार आहे. यामुळे आमच्यासारखे चहा-कॉफीचे शौकीन तिकडे रांगेत लवकर नंबर लावून उभे आहेत. चहाबरोबर कुणी बिस्किटे घेऊनही खात आहेत. काहीजण आनंदवनातल्या पोल्ट्रीतून आलेल्या उकडलेल्या अंड्यांवरही ताव मारीत आहेत !

४ ते ६ सर्वजण मुख्य सभागृहात उतरले आहेत. ही वेळ बौद्धिकांची, भाषणांची, परिसंवादांची व वादविवादांची आहे. मजूरमंत्री ना. तिडके, सर्वश्री शंकरराव देव, एस्. एम्. जोशी, वसंत पळशीकर, श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी, दिवाकर आगाशे यांच्या भाषणातील विचार अजूनही सर्वांच्या डोक्यात घोळत आहेत. विशेषत: उद्घाटनाच्या वेळच्या भाषणातील **'दोन हजार पंखांचा हा फिनिक्स पक्षी आजपासून भारताच्या आकाशात उडणार आहे ! '** हे वाक्य अजूनही अनेकांच्या स्मरणात आहे. 'वर्कर्स युनिव्हर्सिटी'वर झालेला परिसंवाद सर्वांना चांगला उद्बोधक वाटला आहे. या परिसंवादातील सर्वश्री रमेश गुप्ता, डॉ. इंदूताई टिकेकर, प्रा. चंद्रकांत पाटगावकर, श्री. दिवाकर आगाशे, प्रा. दामोदर वेले यांनी या वर्कर्स युनिव्हर्सिटीच्या श्री. बाबा आमटे यांच्या स्वप्नाची सर्व बाजूंनी केलेली मांडणी ऐकून सर्वजणांना या उपक्रमाबद्दल औत्सुक्य निर्माण झाले आहे. श्री. बाबा आमटे यांच्या मुखातून अखंडपणे बाहेर पडणाऱ्या नवविचारांच्या व नवकल्पनांच्या गंगौघात सर्वजण अवगाहन करीत आहेत. श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांनी सोमनाथ येथील हजाराहून अधिक एकर शेती पाणी पुरवठ्याखाली आणून पूरक उद्योगधंदे सुरू करावयाच्या योजनांची मांडणी केल्यामुळे सर्वांना बाबांच्या या स्वप्नाच्या व्यावहारिक बाजूचीही यथार्थ कल्पना आली आहे.

'आजचे देशाचे नेतृत्व युवकांना मार्गदर्शन करण्यास असमर्थ ठरले आहे ! ' हा प्रस्ताव सभागृहापुढे आहे आणि त्यावर विद्यार्थी-विद्यार्थिनी वक्ते आपापली बाजू कुशलतेने व प्रभावीपणे मांडत आहेत. बहुतेकांचा सूर प्रस्तावाच्या अनुकूल असाच आहे. परंतु काहीजण असे प्रतिपादन करीत आहेत की श्री. बाबा आमटेंच्यासारखा थोर चारित्र्यवान आणि कर्तृत्ववान आदर्श तुमच्यापुढे असताना आमच्यापुढे नेतृत्व करणारे आदर्श नाहीत असे तुम्ही कसे म्हणता ? आणि या वाक्याला चहूंबाजूंनी टाळ्यांचा कडकडाट मिळून साथ मिळत आहे ! शेवटी ठराव अध्यक्ष छावणीप्रमुख श्री. शामराव पटवर्धन यांनी मतास टाकला आहे आणि प्रस्ताव संमत झाल्याचे जाहीर केले आहे ! आणि यावरही पुन: सभागृहात टाळ्यांचा गजर होत आहे !

संध्याकाळी ६ नंतर मैदानात आपापल्या तंबूसमोर उभे राहून शिबिरार्थींची

हजेरी घेतली जात आहे. ' जनगणमन ' हे रातित सर्वजण शांतपणे एका सुरात गात आहेत आणि शेवटी अचानक श्री. बाबा आमटे आपल्या छावणीच्या जवळ वाघोबा आल्याची वर्दी सर्वांना देत आहेत. इकडेतिकडे आजूबाजूस न फिरण्याबद्दल बजावीत आहेत आणि रात्री आपण स्वतः वघोस सामोरे जाणार असून आपल्या-बरोबर जे येणार असतील त्यांना बरोबर येण्याचे आव्हान देत आहेत. असंख्य तरुण या आव्हानाला साद देऊन बरोबर येण्यासाठी पुढे येत आहेत. बाबांना समाधान वाटत आहे, ' माझे तरुण घाबरले नाहीत आणि साहसाची त्यांना आवड आहे व संधी मिळताच तिचा फायदा घ्यायला ते पुढे येत आहेत की नाही हेच मला पाहायचे होते ! ' असा खुलासा ते कुणाजवळ तरी सहज हसत हसत बोलताना करीत आहेत !

इथलं जंगलातलं सारं वातावरणच साहसपूर्ण आहे. परवा रात्री जंगलात लागलेल्या वणव्यामुळे यात भर पडली आहे. आमच्या आजूबाजूला सर्वत्र घनदाट जंगलच जंगल आहे. रात्रीच्या वेळी दूरवर कुणाला तरी जाळ व तांबडा प्रकाश दिसला. झाले ! सर्व शिबिरात विलक्षण आणीबाणीचे वातावरण निर्माण झाले ! लाऊडस्पीकरवरून बाबा आमटेंनी सर्वांना झाडाचा पाला असलेल्या फांद्या तोडून,


ज्वलंत राष्ट्रवादाच्या
भयानक दीप्तीचा
ललितपथ्य आलेख

**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

रा. म. शास्त्री
मूल्य पंचवीस रुपये

' माणूस 'मधून प्रसिद्ध झालेल्या
प्रदीर्घ लेखमालेची सुधारित ग्रंथावृत्ती.

राजहंस प्रकाशन,
४१९ नारायण पेठ, पुणे २.

आडव्या रांगात, एकामागे एक उराहून वणवा विझवण्यासाठी चढाईचा आदेश दिला. काही धाडसी मुलांनी प्रल[illegible]ळाच्या ठिकाणी जाऊन ती आग पूर्णपणे विझवून आटोक्यात आणली ! नि[illegible]नुकूल होता. कारण वारा नव्हता. पूर्णपणे पडला होता. त्यामुळे वणवा भड[illegible]ाही ! छावणीत रात्रभर सर्वांचे वणवा लागला की कुणी लावला याबद्दल तर्कुर्क चालू होते !

निसर्गाच्या अनुकूलतेचा आणखीक प्रत्यय येत आहे तो म्हणजे दरसालप्रमाण अजूनही यंदा वळवाचा पाऊस पडलें नाही. कारण असा पाऊस पडला म्हणजे तो या जंगल भागात इतका जोरान्कोसळतो की अक्षरशः सारी झाडं-झुडपं तो झोडपून काढतो आणि या छावणीच्याकाळात जर तो कोसळला तर या तट्टयाच्या आवरणांपैकी एकही जागेवर राहणानाही, सारे सामान व आपण तर भिजूच; शिवाय जमीनीच्या बिळातले साप आ इंगळचा यांचा सर्वत्र सुळसुळाट होईल !

परंतु बाबांना निसर्ग जरी अनुक असला तरी सोमनाथच्या आसपासच्या गावची मंडळी मात्र अनुकूल दिसत ना आहेत. या जंगलात त्यांच्या जमिनी गेल्या आहेत अशी त्यांची ओरड आहे. वास्तविक ही जमीन सरकारने बाबांना दिली आहे. गावकऱ्यांनी आपले गाऱ्हाणे सकारपुढे मांडून दाद लावून घतली पाहिजे. परंतु कुणाच्या तरी सल्ल्यावरून ते बाबांच्या या सोमनाथ प्रकल्पाविरुद्धच सत्याग्रह करायला येणार आहेत अशी वदंता आहे. बाबा येथे येण्यापूर्वी या जंगलात लाकूडतोडी सर्रास चालत असे आणि दारूच्या हातभट्टया खूप चालत असत. त्यांना आळा बसला असल्याने या हितसंबंधी लोकांच्या कारवाया असाव्यात असा सर्वजण तर्क करीत आहे.

सायंकाळी ६ ते ६॥ पर्यंत [illegible]रणे झाल्यावर ८ पर्यंत सर्वांची रात्रीची जेवणे पार पडत आहेत. ८॥ ते [illegible] ही वेळ माहितीवजा चि[illegible] करमणुकीचे सांस्कृतिक कार्यक्रम, सामूहिक [illegible]तचे कार्यक्रम यांसाठी राखून ठेवली आहे. एका रात्री मात्र बाबांनी [illegible]साठी राखून ठेवलेल्या जंगलाच्या फायर लाईनच्या मोकळ्या मैदानात सर्वांना नेऊन मक्याची कणसे भाजून खायला दिली आणि त्यांना 'यूथ व्हिलेज'ची कल्पना समजावून दिली.

बाबांच्या डोक्यात वर्कर्स युनिव्हर्सिटी, यूथ व्हिलेज इ. नवनवीन कल्पनांची व प्रयोगांची स्वप्ने [illegible]त, आपण श्रम करून घाम गाळलेल्या या जमिनी काही वर्षांतच [illegible] फुलाम् झालेल्या दिसतील व सोमनाथ हे कृषि-औद्योगिक [illegible]पर भारताचे तीर्थक्षेत्र होईल अशी स्वप्ने रंगवीत रात्री १० वा. आम्ही झोपी जात आहोत.

कारण उद्या पहाटे [illegible]नः 'जागिये रघुनाथ कुँवर' हे प्रबोधन गीत ऐकून वंदे मातरम् ह्या राष्ट्रगीताच्या वेळी उठायचे आहे आणि पडिक जमिनींना शेतीसाठी बांध घालायला जायचे आहे !

O

# कुरुक्षेत्र

सोमनाथाच्या जंगलातून, या श्रमसंस्कार छावणीतून, खरोखरच दोन हजार फिनिक्स पक्षी आकाशात झेपावू शकतील काय?

मी साशंक आहे. कारण ही छावणी 'कुरुक्षेत्रा'वर टाकण्यात आलेली नव्हती, तिची योजना 'धर्मक्षेत्रदर्शनासाठी' फक्त झालेली होती. श्रम-धर्माच्या एका तप्त-मुद्रेचा संस्कार तेथे जमलेल्या एक सहस्र युवकांच्या अंतःकरणावर उमटला असणार, यात काही शंकाच नाही. परंतु या श्रम-धर्माचे वैरी कोण, या धर्माच्या विरोधासाठी उभ्या असणाऱ्या आजच्या काळातल्या शक्ती कोणत्या, त्यांच्याशी सामना देण्याचे मार्ग कसे आखायचे, मोर्चे कसे बांधायचे, चक्रव्यूह कसे भेदायचे हे साक्षात कुरुक्षेत्रावरच मिळणारे शिक्षण या युवकांना लाभल्याशिवाय या उभारल्या गेलेल्या दोन सहस्र बाहूंचे फिनिक्स पक्ष्यांत रूपांतर होण्याची शक्यता फार कमी आहे. गांधीजींच्या खादीग्रामोद्योगांचा स्वातंत्र्यसंग्रामाशी आणि सर्वोदय समाजनिर्मितीशी अतूट संबंध होता. सावरकरांचे रत्नागिरीतील अस्पृश्योद्धाराचे कार्य त्यांच्या व्यापक हिंदुराष्ट्रसंघटनेचा एक अविभाज्य घटक होता. अव्वल नेतृत्वाला त्या काळातील धर्मही सांगावा लागतो आणि अधर्माशी झुंजण्याची प्रेरणा व मार्गही दाखवावा लागतो. धर्मक्षेत्र आणि कुरुक्षेत्र यांच्या अशा संयोगाशिवाय महाभारत घडून येत नसते.

छावणीच्या अशा काही मर्यादा असल्या तरी श्री. बाबा आमटे यांना अशा संयोगाची आवश्यकता व अपरिहार्यता अमान्य आहे, असे समजण्याचे काहीच कारण नाही. उलट त्यांनीच हा विचार वेगवेगळ्या संदर्भांत दोन-चार ठिकाणी तरी स्पष्टपणे मांडलेला आहे. 'श्रीकैलास ते सिंधुसागर' या अन्न-स्वतंत्रता संचलनाचे त्यांनी स्वागत केले असले तरी या उपक्रमातील अपूर्णता दाखविताना त्यांनी आपल्या 'आंतरभारती'त लिहिले आहे-

'जिस प्रकार धन और ऋण सिरे अलग अलग रहते हुए बिजली का प्रवाह पैदा नहीं कर सकते, वे जुडते हैं तभी चक्र पूरा होता है और छिपी हुई शक्ती प्रकट होती है, उसी प्रकार हमारे अभावात्मक और भावात्मक कार्यों को एक दूसरे से जुडना होगा। आपका काम एक प्रकारका है, जब कि मेरा दूसरे प्रकारका। और केवल अपने अपने काम को करते हुए हम महसूस भी करते हैं कि हम बहुत कुछ करते हुए भी कुछ नहीं कर रहे हैं। सामाजिक वातावरणपर उसका कोई स्थायी प्रभाव होता हुआ नहीं दिखाई दे रहा है। अतः यह आवश्यक है कि हम नयी पीढीके सामने एक साथ आयें। एक दूसरेसे जुडे हुए। तभी एक जबरदस्त ताकद पैदा हो सकेगी, जो देशके मुर्दा वातावरण में प्राणों का संचार कर सकेगी।' [मे १९६८ अंक]

अन्न–स्वतंत्रता संचलन हे स्पृहणीय व अनुकरणीय असले तरी हा अभावात्मक प्रवाह आहे. 'सोमनाथ' हा 'भावात्मक' प्रवाह आहे. असे दोन्ही प्रकारचे प्रवाह एकमेकांना मिळत गेल्याशिवाय सामाजिक जीवनावर चिरस्थायी प्रभाव टाकणारी शक्ती उत्पन्न होणार नाही, हे बाबांचे निदान अचूक आहे. परंतु श्रमसंस्कार छावणीत हे प्रवाहांचे एकीकरण कितपत घडू शकले असेल, याबद्दल मला शंका आहे. एखाद्या व्यापक व अर्थपूर्ण मोहिमेच्या संदर्भात अशा छावण्या संयोजित केल्या गेल्या असत्या तरच हे एकीकरण साधण्याची शक्यता होती. छावणीतून श्रमसंस्कार निश्चित घडले असतील पण श्रमिकांच्या उठावणीशी या संस्कारांचे नाते जोडले गेलेले नाही. हे नाते जोपर्यंत जमत नाही तोपर्यंत हात नुसते शिवशिवत राहतील, त्यातून फिनिक्सचे उड्डाण मात्र संभवणार नाही.

मोर नाचतो म्हणून लांडोरीनेही नाचावे तसे मुंबईतील महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वातानुकूलीत सभागृहात भरलेले तीन दिवसांचे शिबीर होते. शिबिरे ही विशिष्ट संस्कारांच्या दृढीकरणासाठी असतात. या शिबिराच्या संयोजकांना असा कोणताच विशिष्ट संस्कार अभिप्रेत नव्हता. अलीकडे उन्हाळ्यात उदयोन्मुख संघटना व पक्ष आपापली शिबिरे भरवून अनुयायांची बांधबंदिस्ती करतात, आपणही काही केले पाहिजे, एवढीच या मागची अनुकरणाची भावना असावी. भाषणे हा मुख्य कार्यक्रम – जो शिबिरात सर्वांत कमी असतो, असायला हवा. किसनवीरांचे भाषण सर्वांत जास्त गाजले. कारण त्यांनी राज्यकर्त्यांवर केलेले आरोप फारच गंभीर होते. धंद्यात आधी बुद्धी जाते आणि पाठोपाठ भांडवलही जाते, असे म्हणतात. राजकारणातही काही वेगळे नसते. आधी दानत जाते आणि पाठोपाठ राज्यही गमवावे लागते हे समजायला रामायण–महाभारताचे किरकोळ वाचनही पुरेसे आहे. वैराळयांचे भाषणही या शिबिरात गाजले – वेगळ्या अर्थाने. सावरकर सप्ताह साजरे होतात, हेडगेवारांच्या द्रष्टेपणावर परिसंवाद घडतात याचे

म्हणे या मंत्रिमहाशयांना फार दुःख झाले. ६५ साली लाहोरकडे निघालेल्या भारतीय सेना माघारी फिरल्या नसत्या, तशाच पुढे घुसून सिंधुनदीवर त्यांनी आपले विश्रांतीचे तंबू ठोकले असते तर सावरकरांचे सप्ताह कोणीही साजरे केले नसते. हे जोपर्यंत घडत नाही तोपर्यंत सप्ताह साजरे करण्याचाच काय, सावरकरांचे पुतळे उभारण्याचा आणि तोफांच्या चौघड्यात त्यांचे पोवाडे गाण्याचा मोह त्यांच्या अनुयायांना होतच राहणार आहे हे या मंत्रिमहाशयांच्या कसे लक्षात येत नाही ! सावरकर हे सामर्थ्यपूजकांचे दैवत आहेत. समर्थ भारत हवा असेल तर सावरकर अनिवार्य आहेत. कोणी त्यांना वाजतगाजत, मानसन्मानाने पुढच्या दाराने आणतील, कोणी चोरून, लपत छपत त्यांना मागील दाराने घरात घेतील. पण 'सिंधू नाही' तोपर्यंत 'सावरकर आहे' हे मात्र निर्विवाद.

अर्थात हे वैराळे यांना सांगून काय उपयोग !

'हाय कंबक्त ! तूने पोही नही......'

•

नाईकांचा खास विषय अन्नधान्य. या विषयावरील त्यांचे शिबिरातील भाषण म्हणजे थेट 'अन्नस्वतंत्रता'च ! 'दुसऱ्यांच्या अन्नावर जगणारा कोणताही देश स्वाभिमानी राहू शकत नाही' ही त्यांची स्वाभिमानी गर्जना वृत्तपत्रांत ठळकपणे प्रसिद्ध झाली आणि नागपूरहून अन्नस्वतंत्रतेचे एक आघाडीचे कार्यकर्ते श्री. राजाभाऊ कुलकर्णी यांनी मला पत्रातून लिहिले, 'काँग्रेस शिबिरातील श्री. वसंतराव नाईकांचे भाषण म्हणजे आपल्याच पत्रकाची वेगळी नक्कल होती. हॉलंडच्या मुलांची मदत घेताना हे विचार कुठे पळाले होते ? जाऊ द्या, या मोठ्यांच्या गोष्टी ..' या मोठ्यांच्या गोष्टींशी, नाईकांच्या घोषणेशी, अन्नस्वतंत्रतेचे फारसे साम्य नाही हेही येथेच स्पष्ट केले पाहिजे. आपण दुसऱ्याचे अन्न घेतो, भीक-मदत मागतो याचे कारण उत्पादन कमी असे नाईक मानतात. निदान त्यांच्या शिबिरातील भाषणावरून तसे वाटते. अन्नस्वतंत्रता संचलनाला उत्पादनवाढीचे महत्त्व मान्य असले. तरी भिकेचे कारण कमी उत्पादन हे नाही, आपली सदोष व कमकुवत वितरण व वाटपव्यवस्था हे आहे, असा अन्न स्वतंत्रतावाद्यांचा दावा आहे. नाईकांना हा दावा मान्य होईल की नाही हे सांगता येत नाही. पण हा दावा मान्य झाल्याशिवाय व त्याप्रमाणे कृतीची काही कणखर पावले उचलल्याशिवाय, उत्पादन कितीही वाढले तरी आपल्या हातचा भिकेचा कटोरा फेकला जाईल, झोळी गळून पडेल हे सुतराम शक्य नाही. यंदा तर अगदी हास्यास्पद विसंगती आहे, आमच्या शेतकऱ्याची किती लुबाडणूक सुरू आहे याला काही मर्यादाच राहिलेली नाही. भरमसाट धान्योत्पादनामुळे भाव घसरणार म्हणून शेतकरी सचित आहे–(शेतकरी म्हणजे अन्नधान्याची लागवड करणारा. ऊसवाला शेतकरी केव्हाच भाव खाऊन बसला आहे. कारण

त्यांनी संघटना बांधलेल्या आहेत, त्यांचे हितसंबंध जपणाऱ्या व्यक्ती अधिकारावर आहेत.) आणि इकडे अमेरिकेकडून लक्षावधी टन गहू, मिलो यांच्या आयातीचे करार होतच राहिले आहेत. आमच्या शेतकरी संघटना आणि किसान सभा स्वस्थ कशा हेच मला समजत नाही. या संघटनांच्या आणि सभांच्या कार्यकर्त्यांच्या माहितीसाठी ही एक नुकतीच प्रसिद्ध झालेली बातमी मी देतो. त्यांनी यावर विचार करावा–

'चालू वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीसाठी अमेरिकेने ३० लाख टन गहू भारताला देऊ केला आहे.

भारताने २५ लाख टन गहू घेण्याचे तात्पुरते मान्य केले आहे.

गेल्या वर्षी अधिक गहू व अन्नधान्य देण्यासाठी भारताचा अमेरिकेमागे लकडा सुरू होता. या वर्षी अन्नधान्य घेण्याबद्दल अमेरिकेचे दडपण येत आहे. या दडपणाला प्रतिकार करणे भारताला कठीण जाणार आहे.' [ महाराष्ट्र टाईम्स : २९ मे १९६८ ]

हे कठीण जाणार असेल तर स्वातंत्र्याचे रक्षण करणेही कठीणच होणार आहे. गेल्या वीस वर्षांत ही प्रगत राष्ट्रांची दडपणे आपल्यावर सतत वाढत गेली आहेत आणि आता उठणे नाहीत तर केव्हाच उठणे शक्य नाही अशी वेळ येऊन ठेपली आहे. हे सांगण्यासाठीच तर अन्नस्वतंत्रता संचलन होते !

आणि हे सांगणे बरोबर असेल तर महाभारत घडविणारे 'कुरुक्षेत्र' कुठे आहे हे ओळखणेही मग फारसे अवघड नाही.

–श्री. ग. मा.



मे २२, लंडन



सप्रेम नमस्कार

इथे येऊन पंधरा दिवस झाले. आपण आपल्या लोकांपासून इतके दूर(६६०० मैल)आहोत, यावर विश्वासच बसत नाही. विमानाचा प्रवास हे त्याचे मुख्य कारण. सकाळी मी विमानात बसलो तो इथे सूर्य मावळण्यापूर्वीच पोचलो. सूर्याचा मी पाठलागच चालवला होता. विमानाचा प्रवास म्हणजे घरातील एखाद्या कोचावर बसावे इतका सुखकर. त्यामुळे इतके अंतर आपण दूर आहोत, हे बुद्धीला समजते पण मनाला जाणवत नाही. मी ज्या घरी (Lodge) उतरलो आहे, तेथील सर्व वातावरण मराठी आहे. भोवतीची सर्व माणसे मराठी आहेत. बाहेरील वातावरण तर खास पुणेरी आहे. डेक्कन जिमखाना अगर (Camp area) त याहून वेगळे वातावरण नसते. फरक फक्त पोशाखाचा. इंग्रजी बोलण्याची अडचण मला नव्हतीच. त्यामुळे बाहेर वावरताना भाषेचा बदलही फारसा जाणवत नाही.

हा देश ' सुंदर ' माणसांचा आहे. मला इथे पुरुषांचे सौंदर्य स्त्रियांपेक्षाही अधिक जास्त प्रमाणात आहेसं वाटतं. फुलं आणि मुलं दोन्हीही विपुल आहेत. मोह पाडणारी आहेत. रस्ते नीटनीटके, स्वच्छ, इमारती एकसारख्या, स्वच्छ. दुसऱ्याला मदत करण्याच्या बाबतीत तर या लोकांचा कुणी हात धरू शकणार नाही. काम करताना प्रत्येकजणं जीव ओतून करतो. रस्त्यातून चालताना जणू प्रत्येक सेकंद महत्त्वाचा असे चालतात. नव्हे धावतात. एखादी ६० वर्षांवरील वृद्ध स्त्री रस्त्यात मागून पुढे गेली की, हे खूपच जाणवतं. तरीही इथल्या माणसांचे मनोविकार अखेर आपल्याकडील लोकांप्रमाणेच आहेत, हेही लक्षात येण्यास वेळ लागत नाही. इथली वृत्तपत्रे, जवळ जवळ सर्व Conservative. ' Immigrates 'ना सध्याच्या मजूर सरकारने लाडावून ठेवले आहे, त्यामुळे इथल्या लोकांवर

खर्च करण्यास पुरेसा पैसा राहात नाही, हा वृत्तपत्रांतून चालणारा सततचा प्रचार लोकांची मने पोखरत असणारच. वृत्तपत्रांतून जी पत्रे येतात, ती खूपच विषारी असतात. परंतु सुशिक्षितांच्या मनामधील हा दुरावा व्यवहारात कुठेही जाणवत नाही. मला तर पदोपदी मुंबईमधील मराठी लोकांशी याची तुलना करवीशी वाटते. तिकडेही सतत प्रचाराने South Indian हा एक नावडता विषयच बनला आहे. तरीही त्या मानाने व्यवहारात सर्व माणसे गुण्यागोविंदाने नांदताना दिसतात. तसं पाहिलं तर इंग्लंडची लोकसंख्या त्या मानाने बेतानेच वाढते आहे. कारण इथे जितकी माणसे येतात त्याहूनही जास्त माणसे गेल्या एक–दोन वर्षांपासून कॅनडा, ऑस्ट्रेलिया, अमेरिका इत्यादी ठिकाणी अधिक पगाराकरता जात आहेत. अर्थात इथल्या लोकांच्या दृष्टीने हे दुहेरी संकट आहे. कारण जाणारे बहुतेक गोरे आणि येणारे बहुतेक काळे. म्हणूनच ब्रिटन आपल्या संस्कृतीला काही दिवसांनी पारखा होईल, काळचा लोकांचा देश होईल या नुसत्या कल्पनेनेच इथले सर्व लोक अस्वस्थ झाले आहेत. ब्रिटिशांचा राष्ट्रवाद हा तर खूपच कडवा, बराचसा संकुचित आहे.

New Statesman ने या बाबत जी आकडेवारी दिली आहे, ती मात्र ही भीती निराधार ठरवते. त्या माहितीनुसार Immigrants चे प्रमाण २½% तेही बहुतेक London, Manchester इत्यादी भागांतच जास्त (८–१० टक्के) आहे. तसं पाहिलं तर मुंबईप्रमाणं लंडनही Cosmopolitan च आहे. (सर्व गोरे लोक ब्रिटिशच वाटतात. त्यामुळे आमच्या हे लक्षात येत नाही इतकेच.) त्यामुळे लंडन-मध्ये वावरताना हे Racial Discrimination दिसत नाही. बाहेर काही ठिकाणी मात्र व्यवहारातही ते आता थोड्याफार प्रमाणात जाणवते म्हणतात. इथला सर्वसाधारण Employer सुद्धा आता असाच पछाडला गेला आहे की काय असे वाटण्याजोगी परिस्थिती सध्या येथे आहे. लॉजवर Work Voucher वर आलेले वीस–पंचवीसजण आहेत. बहुतेक इंजिनियर्स, एक आर्किटेक्ट, दोन केमि-स्ट्स् आहेत. यांपैकी प्रत्येकजणाने एव्हाना १००–१२५ ठिकाणी अर्ज केले आहेत. प्रत्येकाजवळ सुमारे ५०–६० Regrets, Not Selected पत्रांचा गठ्ठा जमला आहे.

Statistician, Mathematician म्हणून येथे खूप वाव आहे. Computer training चे पुष्कळ वर्ग आहेत. Computer programming आणि Systems Analysist यांपैकी कुठेही शिरकाव मिळण्यास विपुल वाव आहे. आता इथे प्रत्येक Employer हा Computer साठी अक्षरशः वेडा झाला आहे. लहानसहान गोष्टीत आता प्रत्येकजण Computer बसवतो. Dating Partner साठीही आता Computer वापरतात. श्रम करणारे लोक आणि शिक्षक या दोघांचेही महत्त्व इथल्या लोकांना खरोखरच आहे. कारकूनमंडळी आठवड्याला १५–२० पौंड्स मिळवतात. त्यांना Clerical Officers म्हणतात. इथे प्यून्स नाहीत. त्यांना Messenger Officers म्हणतात. त्यांचा पगार कारकुनांपेक्षा जास्त. स्टेशनवर

झाडू मारणाऱ्याला Station Foreman म्हणतात, रस्ता दुरुस्ती, Welding वगैरे कामे करणारे लोक आठवड्याला ४०–५० पौंडांपर्यंत पैसे मिळवतात. शिक्षकाला वर्षाला १५०० पौंड मिळतात.

गेल्या दोन महिन्यांत ब्रिटनची एकूण स्थिती खूपच बिघडली आहे. तिचा परिणाम किती आणि Racial feeling चा परिणाम किती, याबाबत काहीही मत न देणे चांगले. घोटाळा असा आहे की, Science Graduate म्हटला की, सर्रास सगळ्यांना Vouchers दिली जातात. इथला Employer मात्र नोकरी देण्यापूर्वी योग्य माणूसच मिळावा, या दृष्टीने खूप काळजी घेतो. एकदा नोकरी लागली की, प्रत्येकजण इथले लोक किती चांगले–Employer किती आदराने वागवतो, हे सांगू लागतो.

इथे नोकरी लागेपर्यंत प्रत्येकाला आठवड्याला ७ पौंड्स मिळतात. पैकी पाच पौंड Lodge चे भाडे जाते. अन्न खूपच स्वस्त. बिस्किटे, चॉकलेट्स् दूध इत्यादी गोष्टी इतक्या स्वस्त कशा याचे आश्चर्य वाटते. इतर मुख्य खर्च म्हणजे पोस्टेज आणि Transport. Interview ला कुठे लांब जायचे असले तर गाडीचे तिकीट फुकट काढून देतात. (बेकार असेपर्यंत) त्यामुळे २–३ महिने बेकार राहिलेले लोकही परत जाण्याची गोष्ट काढत नाहीत. तीन वर्षे नोकरी मिळाली नाही तर त्यांच्याच खर्चाने परत घरी पाठवतात.

मी इथे आलो त्याच्या पुढच्याच शनिवारी इथल्या महाराष्ट्र मंडळात कार्यक्रम होता. मी गेलो होतो. इथले सर्व मराठी लोक तेथे येतात. बहुतेक दिसले ते थोडेफार वैभव दाखवू शकणारे (बायको–मुले–मोटार). पुण्याचे एक प्राध्यापक आ. रा. कुलकर्णी शिवाजीवर काही Research करता ६ महिन्यांची शिष्यवृत्ती घेऊन इथल्या बखरी चाळीत आहेत. त्यांनी सुरुवातीला भाषण केले. नंतर विजय तेंडुलकरांच्या 'कावळ्यांची शाळा' मधील 'गोंधळ' हा प्रवेश झाला. खूपच कसोशीने बसवला गेला होता. त्यानंतर सौ. खटखटे नावाच्या बाईंनी गीते म्हटली. नंतर 'रायगडला जेव्हा जाग येते' मधील एक प्रवेश झाला. शेवटी पुन्हा गीते. 'बुगडी माझी' ही लावणी बाईंनी सुरू केली आणि सुटाबुटातील माणसे चक्क शिट्या मारू लागली. सगळ्यांच्या बायका हतबुद्ध होऊन पाहात होत्या. कारण पुरुष एवढे चेकाळायचं कारण एक स्त्रीच होती.

इथे आल्यावर दोन चित्रपट पाहिले. इथे चित्रपटांतून आता नग्नतेचे राज्यच खूप आहे. मात्र यामुळेच एखादा चांगला कलाकार, दिग्दर्शक कोणत्याही बंधनाशिवाय फार चांगलं असं काही दाखवू शकतो. मी पाहिलेला Sex from a stranger हा फ्रेंच चित्रपट यांपैकी होता. एका लेखकाच्या (पत्नीपासून विभक्त राहणाऱ्या) जीवनात अचानकपणे एक स्त्री येते. त्याच्याकडे दोनतीन दिवस राहते.

[पृष्ठ ६१ वर]

# आस्वाद

" म्हणसी नाही रे संचित ।। न करी न करी ऐसी मात ।। १ ।।
।। ध्रु ।। लाहो घेई हरिनामाचा । जन्म जाऊ नेदी साचा ।। ध्रु० ।।
गळा पडेल यमफांसीं । मग कैंचा हरि म्हणसी ।। २ ।।
पुरलासाटीं देहाडा । ऐसें न म्हणें न म्हणें मूढा ।। ३ ।।
नरदेह दुबळा । ऐसें न म्हणें रे चांडाळा ।। ४ ।।
तुका म्हणे सांगों किती । सेकीं तोंडीं पडेल माती ।। ५ ।।

नैराश्याने दुबळ्या बनलेल्या हताश मनाला दिलासा देऊन परमार्थाच्या राजमार्गाची वाट त्याला दाखविणारा तुकारामांचा हा एक अभंग आहे. खचून गेलेले मन निष्क्रियतेने जास्त जास्त अधोगतीला जात राहते. येथे त्याला तुकारामांनी एक आवाक्यातले कर्तव्यक्षेत्र दाखवले आहे. आजवर काही पुण्य साठविलेच नाही, सत्कृत्याची शिदोरी काही गोळा केलीच नाही, आयुष्यात काही मिळविले नाही असा नन्नाचा पाढा वाचणाऱ्याला एका सिद्धमाहात्म्याने दिलेले हे प्रोत्साहन आहे.

मनुष्याने या क्षणापर्यंत केलेल्या सर्व कर्मांना 'संचित' असे म्हणतात. मागील सर्व जन्मांत केलेल्या सर्व कर्मांचा समावेश संचितामध्ये होतो. संचित चांगले असेल तर प्रारब्ध चांगले मिळते. निराशावादी, निष्क्रिय माणसाला येता जाता आपल्या संचिताला बोल लावण्याची सवय झालेली असते. 'संचित'च नाही, मग उगाच कशाला प्रयत्न करावयाचा, आहे ते निमूट भोगावे म्हणजे झाले, असा नीरस सूर उगाळला जातो. " न करी न करी ऐसी मात " असे तुकारामांनी यावर अंतरीच्या कळवळ्याने सांगितले आहे. हरिनामाचा लाभ घेण्याचा आग्रह ते त्याला करतात. जन्म वाया न जाऊ देण्याबद्दल विनवतात. पाहता पाहता दिवस निघून जातील. आयुष्याचा प्रवास संपत येईल, गळ्याला यमाचा फास पडेल! मग हरिनाम घ्यायलाही फुरसत मिळणार नाही. दुरितांचे तिमिर नाहीसे करणारे ते अपूर्व, अद्वितीय साधन पाहता पाहता हातचे निघून जाईल.

नरदेहाला क्षुद्र, दुबळा, निरुपयोगी, निंद्य मानण्याबद्दल तुकाराम तीव्र निषेध खरमरीतपणे व्यक्त करतात. अशा लोकांना ते मूढ, चांडाळ म्हणतात. त्यांचे हे उद्‌गार अगदी मनाच्या गाभ्यातून तळमळीने येतात. ज्या नरदेहात हरीचे भवसागरतारक नामस्मरण करण्याची सोनसंधी प्राप्त होते, त्या निर्गुण-निराकार-पर-

ब्रह्माचे गोजिरे सगुण रूप कौतुकाने न्याहाळता नि प्रेमभरे गाता येते, त्या नरदेहाचे महत्त्व न ओळखणारा मूढच होय. आणि ते ओळखण्याचा प्रयत्नही न करता त्याला निखंदावयास तत्पर असलेला दुरात्मा चांडाळच होय. त्यांचे हे अज्ञानकर्म पाहून तुकारामांना त्यांची कीव येते, आणि संतापही येतो !

या वैशिष्टयपूर्ण नरजन्माचे महत्त्व किती सांगू आणि किती नको असे त्यांना होऊन जाते. पण " सेकीं तोंडीं पडेल माती " ही मर्यादा जाणण्याची समयज्ञताही त्यांच्या ठिकाणी अर्थातच आहे, फुकट शेखी मिरविण्याचा त्यांना सोस नाही. त्यांचा तो स्वभावच नाही. नरजन्माचे महत्त्व वर्णन करता करता आत्मप्रौढीच्या प्रांतात शिरू नये इतकी जागरूकता ते दाखवितात. तेथेच थबकतात.

पण तेवढयातच त्यांनी केवढा तरी मोठा आशावाद दाखवून दिलेला असतो. दुबळयाला सामर्थ्याचा, भीरूतेला धैर्याचा मार्ग दाखविलेला असतो. संचित शून्य का असेना, क्रियमाण हरिनामाने भारून टाकल्यावर त्याची पर्वा करण्याचे कारण नाही. इतर कोणत्याही जन्मात न मिळणारी ही सुसंधी मानवाला प्राप्त झालेली असते. तिचा लाभ मात्र प्रत्येकाने घेतला पाहिजे. खचून, मरगळून गेलेल्या मनाला उल्हसित करण्याचे, जीवनातला अर्थ गवसून देण्याचे सामर्थ्य या आशावादात आहे खास. तुकारामांच्या परखड, स्पष्ट पण जिव्हाळयाने, कळवळयाने भरलेल्या वाणीतून असा उपदेश ऐकल्यावर तर ते नक्कीच अवतरेल. कारण त्या वाणीच्या पाठीमागे जे समर्थ व्यक्तिमत्त्व आहे, त्याने हे सगळे स्वतः अनुभवलेले आहे, मनोमन जाणून घेतले आहे.

संतांनी केवळ निवृत्तीचा, नश्वरतेचा, मायावादाचा, निष्क्रियतेचा प्रसार केला असा आरोप करणाऱ्यांनी हा आशावादाचा, सुलभ परमार्थमार्गाचा उपदेश आवर्जून पाहण्यासारखा आहे.

—रसिक

" कुणाचं पत्र आहे ?"

" माझं."

" तसं नव्हे. मी म्हणते कुणाकडून आलंय् ?"

" शांताकडून – मला, तुला नाही म्हटलं !"

" सप्तपदी घातली तेव्हाच तुम्ही–मी हा संबंध संपला नाही का ?"

वंदनाबाई त्यांच्या जवळ गेल्या. " काय म्हणते ?"



आपल्या नवऱ्याच्या चेहऱ्याकडे त्यांनी आतुरतेन पाहिले. परंतु त्यावरचे भावनांचे जाळ काही बदलले नव्हते. थोड्या वेळाने त्यांनी ते पत्र वंदनाबाईंकडे दिले. म्हटले; " घ्या. भगिनीचं पत्र– सोमवारपासून कसलीशी सुट्टी पडते. चार दिवस चेंज म्हणून येणार आहे."

वंदनाबाईंचा चेहरा आनंदाने उजाळला. त्यांना माहेरची अशी कोणीच माणसे नाहीत. मधल्या भावानं वऱ्हाडात कुठंतरी बिऱ्हाड थाटलं. प्रोफेसर होऊन त्यानं एवढंच केलं. छोटी बहीण शांता. तिलादेखील तिकडे जावे लागले. घरात पाहुण्यांची वर्दळ नेहमी राही.

गेल्या दोन वर्षांत शांताला आपण काही पाहिलं नाही ह्याची त्यांना जाणीव झाली. तिच्यात आता खूपच बदल झाला असेल. नुकतंच विसावं सरलं असेल. त्यांनी पुन्हा पत्र वाचलं. आणि तिसऱ्यांदादेखील शब्दांवरून नजर ओघळली.

आपला नवरा आपल्या हालचालींकडे कौतुकाने पाहात तीन–चार मिनिटं स्तब्ध आहे ह्याचा त्यांना विसर पडला. अजून ते तसेच टक लावून पाहात राहिले. लगबगीने त्या आतल्या खोलीत गल्या. आणि तितक्याच तत्परतेने त्या बाहेर आल्या. म्हणाल्या, " घ्या. " कॅप्स्टनचो वलयं लाडिकपणे त्यांच्या चेहऱ्यावर फेकीत ते म्हणाले,

" काय ?"

# असहाय्य

## अनंत देशमुख

" प्रेझेंट."

गुलाबी टाय बाहेर आला.

" कशाबद्दल ?"

" जसं काही माहीतच नाही– शांता येणार म्हणून तुम्ही सांगितलं ना; म्हणून."

" बरोबर " थोडा वेळ हे थांबले; मग म्हणाले, " केवढ्याचं ?"

" ते काय सांगायचं असतं ?"

" नवऱ्याला सांगायचं नसतं ?"

" पावणे सहा–"

" बाप रे."

जिन्यावर पावलं दुडदुडली.

खाली हॉर्न वाजत राहिला. वंदनाबाई गच्चीत आल्या. किरमिजी रंगाचं पातळ, तसल्याच रंगाचा ब्लाऊज, डोक्यावर होस्टेलचा भार. डोळ्यांना निळा–काळा गॉगल. उंचीपुरी व्यक्ती टॅक्सीतून उतरली. प्रथम दाराकडे, मग गच्चीकडे तिने दृष्टिक्षेप टाकला.

" ताऽऽई " खूप आनंदली.

नोकराने सलामी दिली. ट्रंकेला हात घातला. छोटीशी पर्स खांद्याला अडकवून तिने पायऱ्या काटल्या. जिन्यावरच वंदनाबाईंनी तिचं स्वागत केलं. त्यांनी आलिंगन दिलं. अश्रूंचा एक प्रवाह वंदनाबाईंच्या गालावरून खळकन ओघळला. त्यांना आपलं बालपण आठवलं. गतजीवनाचा पट डोळ्यांसमोर तरळला. त्यांनी तिच्या पाठीवर हात फिरवला. " शांता." एक आवंढा गिळल्याचा स्पष्ट आवाज उमटला. " किती बदललीस ग."

शांता लाजून चूर झाली. लालिमा गालावर उधळला. ताईच्या काखेत विसावलेल्या राजूला घेत ती म्हणाली; " अल्ले, लब्बाडा !"

दोन–तीन वर्षांचा राजू पाहातच राहिला. मग आईला बिलगला.

" राजा, मौसी आली बघ ना !"

दोघींनी एकमेकींकडे पाहिले. तृप्ततेची वेगळीच झाक वंदनाबाईंच्या चेहऱ्यावर तरळत होती.

त्यांनी तिला किचन–रूम मध्ये नेले. टेबलावर डिशेस तयार होत्या. म्हणाल्या; "ये–"

"हे काय ?"

"निनावा तुला आवडायचा ना लहानपणी–"

ताईच्या इतकी साधी गोष्टही लक्षात राहते म्हणून तिला आश्चर्य वाटलं.

मग चहाचा ट्रे आला.

वंदनाबाईंनी तिला आपलं सारं घर दाखविलं. "हे बघितलं का शांता– ही ह्यांची खोली. ही डावीकडची आहे ना ही माझी, आणि राजूचीदेखील– ही जिन्यालगतची पॅ–पाहुण्यांसाठी; ही मधली कॉमन. पलीकडे बाथरूम. शिवाय छोटीशीच गॅलरी–"

"ही अण्णांची खोली काय ?" म्हणून तिने पडदा सारला. टेबलावर मासिकांचा गठ्ठा होता; ऑफिसच्या फाईल्स विखुरल्या होत्या. शेजारी पलंग. त्यावर गादीदेखील. त्यावर स्वच्छ पलंगपोस– पांढऱ्याशुभ्र दोन उश्यादेखील. समोरच गोदरेजचं कपाट, लहानशा खोलीत खुर्च्यादेखील होत्या – एक वेताची, एक आराम-खुर्ची. किती टापटीपपणा होता. शांता भारावली.

मग खूप खूष झाली.

"अग आत्ताच गेले हे. म्हणाले कसे; 'आज स्वारी खुष दिसते हं.'"

"आणि राजूचा गालगुच्चा घेतला."

त्यावर त्या खूप हसल्या.

आपला मेव्हणा पुण्याच्या पोलिस खात्यात बडा ऑफिसर आहे ह्याचा तिला अभिमान वाटे. गोदरेजच्या कपाटात ओळीने लावलेल्या 'शिल्डस्'कडे पाहताना तिचा ऊर भरून येई. ती सारी पारितोषिकं ती एका दृष्टीत साठविण्याचा प्रयत्न करी. इतके बडे ऑफिसर असून त्यांच्या बोलण्यात कुठे कटुता– त्यांच्याच विचाराने तिचं छोटसं मन भारलं होतं.

शांताच्या आगमनाने घरात उत्साह आला होता. उश्यांचे अभ्रे, टेबलक्लॉथ, पडदे–वेगवेगळी लेणी घेऊन प्रौढीने मिरवू लागले. भरतकामाचे अनेक नमुने खोलीतून दिसून येत. राजूच्या बुशशर्टच्या खिशावरही बदाम उमटला. शांता खूष होती; स्वतःला विसरण्याचा प्रयत्न करी.

वेगवेगळी जोडपी फिरायला जाताना पाहिल्यावर तिलाही हेवा वाटे. तिनं देखील आपल्या गुलाबी हृदयाशी फुलपाखरासारखं नाजूक स्वप्न कवटाळलं होतं. छोटासाच संसार, शब्दांत विरघळणारा नवरा. दिसायला वेताचाच. कधी कधी

तापणारा. उगीचच हो, का नाही रागवावं–रुसावं ? मग हळूच कवटाळावं, म्हणावं; " रागावलीस ?"

मग जमिनीवर हात फिरवावा. नजरेतून फुलं उमलावीत आनंदाश्रू... " तुम्ही रागवायचं नाही तर कुणी हो ?" आणि आपण आपल्या दोन्ही हातांनी त्याला विळखा घालावा......

_त्याच्या जागी तिला कुमार पानसे दिसायचा. तिच्याशी लगट करणारा. पण मनानं कचखाऊ, मित्रा, स्वभावानं नेभळट. दुसऱ्यांदा तिला अण्णा दिसले. –आपले मेव्हणे... त्यांचा करडा, कडवा स्वभाव...शिस्तबद्ध जीवन ..आपण खूष झालो. " शांता " तिला स्पष्ट जाणवलं...नंतरचा नकळत स्पर्श...सुखावली... धुंद झाली...क्षणभरच !

थोड्या वेळानं तिची धुंदी भंगली. भावनाविवश झाली. पाहिलं–

वंदनाबाईंनी आणलेला दुधाचा ग्लास अजून तस्साच होता. विचारचक्रात अडकलेली शांता अधिकच अडखळली. उठली. तोल जात होता; स्वतःला सावरत होती. दूध घेऊन ती अण्णांच्या खोलीकडे निघाली. पडदा सारला. अजून ते लिहीतच होते. जवळ गेली म्हणाली; " दूध–"

त्यांना खेटून ती उभी राहिली. म्हणाली, " काय करताय् ?" विषय बदलला. " अण्णा–" तिनं असं काही पाहिलं. अण्णांना ते विचित्र वाटलं. मग तेच म्हणाले; "आण इकडे."

दुधाचं भांडं देता–देता तिनं अण्णांचे हात घट्ट धरले. हात थरथरत होते. एक हुंदकादेखील फुटला. अण्णांनी स्वतःला सावरलं.

" शांता " मोठा गडगडाट झाला.

बाहेर काळोख होता. घड्याळाने अकराचे ठोके घ्यायला सुरुवात केली. वंदनाबाई राजूसह केव्हाच निद्राधीन झाल्या होत्या.

स्टेशनवर अण्णा आले होते. म्हणाले; " जरा जपून वागत जा !" आणि मग ती रडतच राहिली. रुमाल भिजून चिंब झाला. गाडी हालली. दूरवर " बाय् बाय् ". म्हणून अण्णांनी फडकावलेला रुमाल अदृश्य होत आहे.

छोट्या पर्समधून तिने चिठोरी काढली. कुमार पानसेचा पत्ता तिनं निरखून पाहिला. अनेक वेळा त्यानं तिच्यापाशी आपलं प्रेम व्यक्त केलं होतं. शांता त्याला टाळत होती.

—आज असहाय्य होऊन ती त्याचं जीवन फुलवायला जात होती–

○

मुंबईच्या धावपळीच्या झगमगत्या सांस्कृतिक जीवनापासून हे लिहीत असता मी फार म्हणजे फारच दूर आहे. थोडा समुद्र डुचमळत्या वाफोरातून ओलांडून, पुष्कळशी धूळ अंगावर घेऊन स्वतःची हाडे गोळा करीत इथे पोचावे लागते. कुठली तरी अंगभर धूळ येथल्या धुळीच्या समुद्रात एकदाची खिळखिळ्या अंगाने आणून टाकणे म्हणजे इथे येऊन पोचणे, म्हणा ना. अंगावरची धूळ झटकण्याचाही प्रश्न नाही; कारण नवी धूळ चढणे इथे असेस्तोवर संपत नाही. सडकेने एखादी एस. टी. नाहीतर बैलगाडी गेली, जवळपास कोणी काहीही झटकले, इतकेच नव्हे तर वरचे झाड जरी जरासे कुठे उन्हाळी वाऱ्याच्या गरम झुळकेने हलले तरी अंगावर नवी धूळ चढते. मुंबईच्या सांस्कृतिक क्षेत्रात रोज उडणारी अफवांची आणि वादांची धूळ बरी, की ही साधी आणि विशुद्ध धूळ बरी? काही ठरत नाही. एवढे खरे, की

# कुंई...कर्रर्र्-रवट्! कुंई...

डोके आतून तूर्त रिकामे आहे आणि केसातून एकदाच कंगवा फिरवला तरी तो धुळीने भरतो इतके ते वरून भरलेले आहे.

या आठवड्याला सुप्रसिद्ध अभिनेत्री सुलोचनाबाईंवर काही लिहिण्याचे वस्तुतः ठरवले होते. त्यांच्या चित्रपटसृष्टीतील पदार्पणाला पंचवीस वर्षे पुरी झाल्याचे कुठे तरी मध्यंतरी वाचले आणि लिहिण्याजोगे यात निश्चितपणे काहीतरी आहे असे वाटले. इथे येऊन पडल्यावर सुलोचनाबाई कोण तेच आता नीटसे कळत नाही. इथल्या रहाटाचे बैल बांधणाऱ्या-सोडणाऱ्या, वाडीवाडींतल्या झाडांना पाणी देणाऱ्या आणि दूध-ताडगोळे-वांगी घेऊन रोज नाक्याकडे तरतरत जाणाऱ्या कळकट-मळकट आणि बेंगरूळ बायाच तेवढ्या खऱ्या वाटतात. साऱ्या उन्हाने रापलेल्या, धुळीने माखलेल्या, रूप ही गोष्ट मुळीही खिजगणतीत नसलेल्या यातल्या म्हाताऱ्या म्हाताऱ्या आटीव अंगाच्या आगरिणी मात्र लहान पोरीसारखी केसात फुले माळतात, नक्षीचे आकडे घालतात आणि चालतात-बोलतातदेखील हुबेहूब लहान पोरींसारख्या. त्यांच्या बारक्या बारक्या सुरकुतल्या डोळ्यांत टवटवीत, उत्सुक बाल्य आढळते. त्याच, म्हणायच्या तर, येथल्या सुलोचनाबाई! पण त्या अभिनेत्री नाहीत, साध्या कामकरणी आहेत. कशाला पंचवीस वर्षे पुरी झाली यातलेही कौतुक इथे पार वाटेनासे झाले आहे. डोंगर-झाडांपासून घरे आणि माणसापर्यंत बहुतेकांची वये निदान पाचशे-हजार वर्षांची वाटतात! मीच मला झोपा-

या झोपाळ्याला बाकी एक नशा आहे. बसले की तंद्री लागते, थांबवत नाही. मन थांबले तरी पाय झोके काढीतच राहतात. सगळे विचार तहकुब होतात, आणि फक्त 'कुंई-कर्रर्-खट्' एवढा एकच विचार मेंदूत चालू राहतो. उद्या काय? कुंई-कर्रर्-खट्... पुढे काय ?कुंई... आयुष्याचे... महाराष्ट्राचे... भारताचे... जगाचे काय?... काही नाही, कुई कर्रर – खट्....

# कर्रर्... खट् ! कुंई ... कर्रर

ळ्यावर बसून दरवेळी कुंई...कर्रर् खट् करीत झोके घेता घेता मध्येच दहापाच हजार तरी वर्षांचा वाटतो ! (तरी बरे, रोज हट्टाने दाढी करतो आहे.)

इथल्या सांस्कृतिक जीवनाचे दृश्य काय आहे? एस. टी. तून उतरलो तर सलामीला समोरच एक रंगीबेरंगी पोस्टर दिसले. बाकी सर्व म्हणजे थिएटर, वेळा वगैरे–तपशील मोठमोठ्या लाल लाल अक्षरांत छापलेल्या या पोस्टरवर, निमंत्रणपत्रिकेत रा. रा. यापुढे भरण्याच्या तपशिलासाठी कोरी रेघ ठेवलेली असते ना,तशा रेघेवर शाईने चित्रपटाचे नाव बारीक किरट्या अक्षरांत लिहिले होते, मुझे जिने दो. त्या दिवशी त्या चित्रपटगृहात रा. रा. मुझे जिने दो मुक्कामास असावेत. त्यानंतर गेल्या आठवड्यात रा. रा. परवरिश येऊन गेले आणि तूर्त रा. रा. साज और आवाज यांचा मुक्काम तिथे आहे, असे कळते. थिएटर वर्षानुवर्षे जरा मोठ्याशा खोक्यासारखे कायम आहे. चित्रपट दाखवण्याचे एकुलते एक यंत्रही आपले कर्तव्य दर रीलगणिक दहा मिनिटे रेस्ट घेऊन आणि देऊन रोज इमानाने बजावते आहे, प्रेक्षकदेखील तेच आहेत. फक्त चित्रपटात बदल. धर्मशाळेतल्या भुरट्या पाहुण्यांप्रमाणे त्यातले ते मनोज, सायरा, मीनाकुमारी, मेहमूद, अशोक आणि वहिदा येतात. दोन तीन रात्री कोठल्यातरी लोकविलक्षण सप्तरंगी जगातली प्रेम, गैरसमज, ताटातूट, पाठलाग, द्वंद्व गीते, तोकड्या कपड्यातली स्नाने आणि खून इत्यादी गंमत करून आल्यावाटेने मुकाट जातात. पाहणारे पुन्हा बाहेर पडून आपा-

पल्या वाडीवर धूळ तुडवीत शांतपणे जातात. रहाट जोडून त्याच्या रें–रें ऽ रें–रें ऽ सुरावर पडवीतल्या झोपाळ्याची कुंई कर्रर्‌–खट्‌ लय जमवीत विड्या फुंकीत नाही तर तमाखू चढवून तास न्‌ तास डोके बंद करून उघडेबंब बसून राहतात. त्यांचे जग वेगळेच आहे. अशोक–मनोज किंवा वहिदा–सायरा त्यांच्यावर काहीही परिणाम करू शकलेले नाहीत. शरीर आणि कपडे हे दाखवण्यासाठी किंवा पाहण्यासाठी असतात हेच इथे सगळे पार विसरून गेलेले दिसतात. शरीर कसेतरी झाकण्यासाठी एखादे वस्त्र ही इथली रोजची फॅशन. बाकी ते उघडे असले तरी त्याला प्रेक्षक नसतात. आणि ते प्रेक्षणीयदेखील नसते. कारण धुळीच्या पुटांनी आणि घामाच्या रापाने ते एकपरी झाकल्यासारखेच असते. त्याचा रंग एकच: धुळकट.

## स्थानिक अशोक-वहिदा

नाही म्हणायला संध्याकाळी एखादी तरतरीत दोन वेण्यांवाली, उद्‌गार–चिन्हाचे कुंकू लावून, तसलेच इयरिंग्ज घालून आणि वेणीत एखादे गोंडस फूल खोवून वायलच्या साडीत स्वतःला वहिदा समजून ओक्याबोक्या सडकेने उगीच मुरडत जाताना इथल्या धुळीत दिसतेही, पण या धुळीत अस्सल वहिदादेखील चार–आठ दिवसांत झाकली जाईल, तिथे या स्थानिक वहिदाचे काय हो! तिला इथे प्रेक्षक भेटलाच तर तो आठ–पंधरा दिवसांसाठी मुंबईवरून आलेला; उपासमार झालेल्या नजरेने गावात उगीच इस्त्रीचे कपडे घालून शीळ घालीत भटकणारा एखादा दत्तू गुरव नाहीतर नंदू देव वगैरे.

पण थांबा! थिएटरातल्या पडद्यावरच नव्हेत तर अगदी खरेखुरे फिल्मी सितारे येथून केव्हा ना केव्हा इम्पाला आणि भरपूर धूळ उडवीत गेले आहेत. इथे चित्रपटांची चित्रीकरणे झाली आहेत. ऐकलेल्या नावांपैकी दोन–चार पाहिल्याचे आठवले, काही नावे कुठे तरी वाचल्यासारखी वाटली आणि काही थोडी प्रथमच ऐकिवात आली, त्याअर्थी त्यांनी रुपेरी पडदा बघितला नसावा. काही असले तरी, इथले धूळ भरले निसर्ग–सौंदर्य कॅमेऱ्याने टिपून रुपेरी पडद्यावर मांडले की, धूळ रुपेरी होते, असा जात्याच मॅड चित्रपट व्यावसायिक जमातीचा केव्हा तरी विश्वास असावा. एक सुप्रसिद्ध मराठी चित्रपटतारका आपल्याकडे चांगली आठ दिवस होती, असे एक वडीलधारे गृहस्थ उघड्या छातीवर हात मारून सांगत होते. भल्या पहाटेपासून रात्रीपर्यंत स्वयंपाकपाण्यात गुंतलेल्या त्यांच्या घरच्या श्रमजीवी बायामाणसांत चित्रीकरणापुरतेच स्वयंपाकपाणी शिकलेली ही तमाशा–पट 'फेम' सुडौल नार कशी शोभली–वावरली असेल, ही कल्पनाच एका कौटुंबिक मनोरंजक चित्रपटाला जन्म देण्याइतकी झक्क होती. एक–दोन ख्यातनाम पटकथा–लेखक लेखनासाठी इथे मुद्दाम राहिले होते, असेही 'जॉर्ज वॉशिंग्टन येथे झोपले होते'च्या आदरयुक्त स्वरात मला सांगितले गेले. म्हणजे इथे शिजलेले थोडेफार 'सांस्कृतिक' पुढे मुंबई आणि महाराष्ट्राने केव्हातरी चाखले आहे.

आल्यापासून इथल्या भिंतीवर आणि आडजागी एका मुंबईकर नाट्यसंस्थेच्या 'अंमलदार' नाटकाची रंगीबेरंगी पोस्टरे अर्धीमुर्धी दिसत आहेत. त्याअर्थी तात्पुरत्या मांडवाखालची आणि सटीसहामासी येऊन जाणारीच पण एक रंगभूमीही या गावाने पाहिलेली दिसते. एक प्रसिद्ध जुनी नाटकमंडळी याच गावात कर्जबाजारी होऊन बंद पडली, असेही ज्येष्ठ गावकरी चुकून अभिमानाने सांगतात. 'अंमलदार' मधले 'पु. लं'चे साहित्यिक पाणी दिलेले हातखंडा नर्मविनोद इथल्या धुळीतच गेले असणार. शिवाय दोन प्रमुख नट गैरहजर होते. पण 'नाटक केल्यांनी बरे' असे सांगणारे एक सद्गृहस्थ भेटलेच. मुंबईच्या भाषेत सांगायचे तर हा एक 'उदार' प्रेक्षक! सत्यनारायणाच्या पूजेनिमित्त पलीकडल्याच गावी आज रात्रौ 'देवमाणूस' नाटक आहे. इथल्या एका देवळात अशा उत्सवी नाट्यप्रयोगात सुपारीचे झाड तुटून ऐन नाटकात रंगभूमीवर पडले आणि त्याने एक नटी बेशुद्ध झाली असा रोमहर्षक किस्सा त्या देवळानजीक ऐकला. ही अर्थात बऱ्याच वर्षांपूर्वीची घटना, पण अजून सांगितली जाते म्हणजे या गावातले नाट्यप्रेम यात दिसते. ती नटी अद्याप हयात आहे.

भजन-कवाल्यांचीही सवय सार्वजनिक पूजांनिमित्ताने इथे थोडीफार आहे.

पण तरीही हे गाव-म्हणजे यातली माणसे-सत्यनारायणाची महापूजा एवढे एक अपरिहार्य धार्मिक कारण वगळता रात्रौ एखाद्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी कुठेतरी आग्रहाने आणि वक्तशीर जातील असे वळणच इथे नाही. जेवणाने या हवेत पोट लगेच जड होते. शरीर सुस्तावते. मग काळोखात धूळ-गोटे तुडवीत जाणे नको वाटते. गर्द वाड्यांनी वेढलेल्या इथल्या वेड्यावाकड्या सडकांवर अजूनपर्यंत पंचायतीचे मिणमिणते दिवे गावकऱ्यांच्या समजुतीसाठी होते. अलीकडे वीज आली; पण दिवे भरपूर अंतरावर, वतनदार काळोखाला पुरेसे क्षेत्र ठेवून उभे केले आहेत. मधूनच ते जातात. किंवा रोज आळीपाळीने गेलेले असतात. हे सगळे गावकऱ्यांच्या रात्रीच्या अपवादात्मक सांस्कृतिक उत्साहावर पाणी पाडते. मग फार फार तर जवळच्याच देवळात बिझिकचा अड्डा मांडणे एखाद्या शनिवारी घडते. हे, उत्सव वगळता, एथले जास्तीत जास्त सांस्कृतिक. पावसाळ्यात तर उभ्या गावावरच पाणी पडत असते.

हां, अलीकडे क्वचित कुठे कुठे ट्रान्झिस्टर येऊन पोचले आहेत. पण झोपाळा-रहाटाच्या येथल्या पेटंट संगीताची नशा अजून ट्रान्झिस्टरच्या आवाजात येथल्या मंडळींना नीटशी सापडलेली दिसत नाही. इथल्या रक्तात हे एकच झोपाळा-रहाट संगीत वर्षांनुवर्षे जसे भिनले आहे, झोपाळे आणि रहाट बहुधा दोन दोन, तीन तीन पिढ्यांचे जुने आहेत. रहाट आता पंपामुळे हळूहळू इथून उठत आहेत. कुठे तरी चालू होणारा एखाद्या पंपाच्या फट्फटीचा वेग इथल्या सुस्त, रें-रें जीवनाला आता द्रुत लयीत खेचू पाहतो; पण त्याला अजून खूप काळ लागेल. रहाट गेले

तरी झोपाळे राहतीलच. तोवर ट्रान्झिस्टर फक्त एक नवी शहरी चैन. सांस्कृतिक गरज म्हणून घरोघर झोपाळाच.

## ' सांस्कृतिक चळवळ '

या झोपाळयाला बाकी एक नशा आहे. बसले की तंद्री लागते. थांबवत नाही, मनाने थांबले तरी पाय आपोआप झोके काढीतच राहतात. सगळे विचार तहकूब होतात आणि फक्त ' कुंई कर्र्र्–खट् ' एवढा एकच निर्गुण–निरामय विचार मेंदूत ठराविक अंतराने वाट्टेल तेवढा वेळ चालू राहतो. उद्या काय ? कुंई कर्र्र्-खट्...... पुढे काय ? कुंई कर्र्र्–खट्......आयुष्याचे–महाराष्ट्राचे–भारताचे–जगाचे काय ? काही नाही, कुंई कर्र्र् खट्...कसली चिंता म्हणून नाही. व्याप नाहीत, घाई गडबड नाही. दैनंदिन व्यवहारातून माणसाला अशी स्वस्तात आणि हवीतेवढी मुक्ती देणारी दुसरी चीज नसेल. ट्रान्झिस्टर–चित्रपट–नाटके – संगीतोत्सव–वासंतिक व्याख्याने आणि परिसंवाद–फ्रीस्टाइल कुस्त्या–क्रिकेटच्या मॅची, कशातही मेंदूला अशी विनामूल्य, विनासायास, हुकमी आणि सुंदर गुंगी आणण्याचा वकूब नाही. या भागाची महाराष्ट्राच्या इतकेच नव्हे तर जागतिक सांस्कृतिक चळवळीला ही एक देणगी म्हणता येईल. प्रत्येक पडवीत रात्रंदिवस झुलणारा हा कुंई... कर्र्र्–खट् ! हीच येथली दीर्घ परंपरा असलेली एकमेव, अखंडित आणि खरीखुरी ' सांस्कृतिक चळवळ ' !

आता तसे पाहिले तर देवळात शनिवारी बिझिकचा अड्डा पडतोच. देवाच्या डोंगरावरून खाली पाहिले तर एक क्रिकेटचे आखले-रेखलेले पिच बऱ्यापैकी अवस्थेत आढळते. तिथे कोणीतरी क्रिकेट खेळत असतीलच. डोंगरावर गेले की खाली कुठे ना कुठे ताशा कडकडताना ऐकू येतो. ताशावर मधोमध दहा पैशांचे नाणे ठेवून ते जमिनीवर पडेपर्यंत सर्वांनी तो एकच ताशा बडवणे अशी म्हणे एक स्पर्धा या भागात लग्नकार्यात वगैरे लागत असते. ( आहे, स्पर्धाही इथे आहे ! ) देवळात कधीमधी कुणाच्या अंगात येते. वर्षाचा देवाचा उत्सव मोठा असतो असे सांगतात. ( स्पर्धा आहे, उत्सवही आहे–फक्त बिनसरकारी. ) त्या निमित्ताने ' फेअर ' भरते. फक्त इथे तिला साधीच ' जत्रा ' म्हणतात. इथे मुंबईहून रोज सकाळचे वर्तमानपत्र दोन प्रहरी पोचते आणि लगेच संध्याकाळपर्यंत ते रद्दीत गेलेले असते किंवा त्याचा एखादा अन्य विधायक उपयोग करून झालेला असतो. कित्येक वर्षांत एखादा पौष्टिक आंतरराष्ट्रीय अग्रलेख इथे कोणी वाचल्याचे ऐकिवात नाही. चुकून वाचलाच तरी त्याचा त्रास कुणी करून घेतलेला नाही.

फ्रान्समध्ये अराजकाचा कहर चालू आहे, व्हिएटनाममध्ये लाखो माणसांची कत्तल घडते आहे, जॉर्डन-इस्राएलमध्ये वाढत्या चकमकी होताहेत–फिकीर नाही. दुनियेतल्या तमाम जटिल समस्यांवर, यक्ष-प्रश्नांवर इथे रामबाण उपाय आहे...

कुंई...कर्रर्रं–खट् ! संपादक काय कपाळ यापुढे आणखी शहाणपण दाखवणार ? कालच एकजण सहा जूनला पृथ्वीचा अंत होणार त्याचे काय म्हणून मला अगदी सहज शिळोप्याचे म्हणून विचारीत होता. त्याला म्हणे हे कोणीतरी सांगितले. याबद्दल काही अधिक जाणून घेण्याची घाई त्याला मुळीच नव्हती. ' काय व्हयल ते कळंलच नाय का जूनला ?' हे त्याचे व्यवहारी म्हणणे.

झोपाळ्यावर बसून कंटाळा आलाच–तो सहसा येत नाही—तर इथली मंडळी रुचिपालट म्हणून देवळात जातात. देवळात जाऊन कंटाळा आला तर नाक्यावर जाऊन ' वयूने ' येणाऱ्या एष्टीतून उतरणाऱ्या, न उतरणाऱ्या मंडळीची गंमत पाहतात. हीही म्हटल्यास एक सांस्कृतिक ॲक्टिव्हिटी या दिवसांत त्यांना तास न्-तास पुरू शकते. समुद्र आहे पण त्यावर फारसे कोणी जात नाही. कारण एकतर तो असा ' नाक्यावर ' नाही, लांब आहे. त्यावर मुद्दाम ' जावे ' लागते. आणि ज्याने झोपाळ्याची नशा चाखली त्याला समुद्राच्या खर्जाचे काय होय ? भीमसेन जोशांचे गाणे मनसोक्त ऐकलेल्याला ' जरा कृष्णा शिंदे ऐकाच ' म्हणून सांगण्यातला प्रकार ! समुद्राला भाव बिनझोपाळ्यांच्या भागात–किंवा त्या भागातून आलेल्यांपुरता. एरवी तो लेकाचा समुद्र रोज इथे भरतो आहे आणि ओहोटतो आहे, भरतो आहे आणि ओहोटतो आहे. कोणी त्याला महत्त्व देत नाही. इथे राहून समुद्रावर गेले, की समुद्रसुद्धा एक भला थोरला झोपाळाच वाटतो, झाले.

इथे मी राहतो त्या आसपास दोन भाऊ मुंबईहून येऊन उतरले आहेत. ते


काळ्याभोर रेशमी विपुल केसांकरिता

**डोंगरे**

# अप्सरा

हेअर ऑईल

उत्पादक

**के. टी. डोंगरे ॲण्ड कं., प्रा. लि.,**

मुंबई, कानपूर, नैरोबी ( आफ्रिका )

**डोंगरे बालामृताचे**

मूळचे इथलेच, पण मुंबईला असतात. एकदा मी जातायेता काही स्थानिक मंडळी पडवीत जमवून हे दोघे त्यांना दारूड्याच्या वगैरे नकला करून दाखवीत होते आणि ती मंडळी मन लावून त्या पाहात बेफाम हसत होती. या दोघांतला एक सर्वांना सांगत होता, की लवकरच तो विमानाने जाऊन राष्ट्रपतींपुढे दिल्लीत नकला करणार आहे! बॉम्बेहून विमानाच्या डिपार्चरची तारीख आणि वेळदेखील त्याने सांगितली. त्यात कठीण काही नाही, एकदा सांताक्रूझला विमानात बसले की दिल्ली आल्यावर पट्टा सोडायचा, असा दिलासा त्याने त्याच्या श्रोत्यांना दिला. दुसऱ्या दिवशी दुसरा भाऊ मला रस्त्यात भेटला. मी चित्रपटसृष्टीतला कोणी थोडाफार मातबर माणूस असावा अशा गैरसमजुतीने आपणा दोघांना ‘चान्स’ देण्याची प्रेमळ गळ त्याने घातली. तिसऱ्या दिवशी दोन प्रहरी त्या बाजूला ओरडा झाला म्हणून चौकशी केली तर दोघे भाऊ खरी हातमट्टी मारून दंगा करीत होते. एक पुनः पुन्हा ‘मरा सोर’ म्हणत जवळच्या ॲक्च्युअल विहिरीत उडी घेऊ पाहात होता, दुसरा झोकांड्या खात त्याला ‘मरल्या हिरीत फुकट मरशीर’ म्हणून बजावीत स्वतः भलकांडत होता. दोघांच्या बायका दोघेही विहिरीत गेल्यासारख्या हंबरडा फोडून रडत होत्या. त्या दिवशी मन लावून नकला पाहणारीच गाववाली मंडळी घोळक्याने जमून हे अस्सलदेखील तितक्याच मनापासून पाहात करमणूक करून घेत होती. आज सर्वांना जमवून त्या दोघांनी मिळून कोंबडीच्या सागुतीचा बेत साजरा केला आणि दारूड्याची धरून पुन्हा त्याच सगळ्या नकला तेवढ्याच तपशिलाने केल्या आणि गाववाले तेवढेच बेफाम हसले.

उद्या हे दोघे दिल्लीला नाहीतरी मुंबईला फणस, कांद्याच्या माळा, असे काही-बाही डोक्यावर घेऊन एष्टी पकडून आपटत धोपटत रवाना होतील. (मीही लवकरच निघणार आहे!) तरी गाववाल्यांचे अडणार नाही. आपापल्या वाडीवरचा रहाट जोडून पडवीतल्या झोपाळ्यावर ते शांतपणे स्वार होतील आणि विड्या जाळीत नाहीतर तमाखू चढवून तास न् तास ‘सूर’ लावतील — कुंई......कर्रर्र्—खट्......कुंईक्......कुंई......कर्रर्र्र्—खट्......कुंईक्......

आपण लिहून देतो, यांचे कशाहीवाचून अडणार नाही.

**ताजा कलम :**

आत्ताच कळले की चार वर्षांमागे या गावात चक्क एक वाघ वाट चुकून आला होता. डोंगरावरून त्याला हे वाड्यांनी वेढलेले गाव म्हणे जंगल वाटले. तो हजर झाला तो थेट नाक्यावर. तिथे त्याला पाहून एकच खळबळ उडाली. कुणीतरी मग बंदूक शोधून आणली आणि त्या वाट चुकलेल्या वाघाचे पारिपत्य करण्यात आले.

झोपाळ्यांची नशा झाडून या गावाने काही केल्याचे नमूद आहे ते हे एवढेच.

○

# ती वेळ न येवो

११ डिसेंबर १९६७ चा भीषण भूकंप झाल्यानंतर कोयनानगर येथील जीवन पूर्णपणे विस्कटले ते अद्याप स्थिरस्थावर झाले नाही. भूकंपानंतर हाताशी लागले ते आपले बिऱ्हाडाचे सामान घेऊन मिळेल त्या वाहनाने लोक शक्य तेथे बाहेरगावी गेले, त्यानंतर अद्याप बिऱ्हाड झाले आहे असे एखादे अपवादात्मकच. बहुसंख्य सरकारी नोकर एकेकटेच परतले.

या महिन्याच्या सुरुवातीपर्यंत हे सर्व नोकर धरणारजवळील पॉवर हाऊस रस्त्यावर व आसपास तंबू उभारून राहात असत. आता हळूहळू ३ ते ४ जणांना मिळून एक अशी नवी बांधलेली निवासाची जागा मिळू लागली आहे. ही नवी बांधणी भूकंपाला दाद न देणारी (Earthquake proof) आहे असे सांगण्यात येते. या नव्या इमारती जुन्याच चौथऱ्यावर बांधल्या आहेत. साधारणपणे गुडघ्याएवढ्या उंचीच्या भाजलेल्या विटांच्या भितींत लाकडी खांब व त्यावर लाकडीच वासे आहेत. या छोट्या भितींवरचा छतापर्यंतचा म्हणजे भितींचा भाग पत्र्याचा आहेत. छप्पर तशाच किंवा सिमेंट पत्र्याचे आहे. दरवाजे वगैरेही अशाच पत्र्याचे आहेत. हे पत्रे लाकडी चौकटीवर लांब तार-खिळ्यांनी मारले आहेत. ही नवी निवासस्थाने जोराच्या भूकंपधक्क्याला कितपत यशस्वीपणे तोंड देतील

याची खात्री नसली तरी, लहान लहान भूकंपधक्क्यांची नोंद राहणाऱ्यांना आपल्या जोरदार थरकापाने पत्र्याचा आवाज करून देतात. दररोज एकदोन धक्क्यांची नोंद या निवासस्थानरूपी नव्या यंत्रावर होत आहे. ( जोराच्या धक्क्यांनी तार-खिळे जागेवर राहणार नाहीत ही मुख्य भिती आहे ).

सर्वांत मोठी भिती येणाऱ्या पावसाळ्याविषयी वाटते. कऱ्हाडकडून येणाऱ्या रस्त्यावरचे अनेक ओढ्या-नाल्यांवरचे पूल पडलेले आहेत. नाले सध्या कोरडे असल्यामुळे वाहने पुलाच्या बाजूने नाल्यात उतरतात व पुन्हा चढून पलीकडे जातात. हे पडलेले पूल पावसाळ्यापूर्वी बांधून पूर्ण करण्याचे प्रयत्न जोरदारपणे चालू आहेत. परंतु हे पूल पूर्ण झाले तरी या साथीला सध्या वापरात असलेले काही पूल बळी पडणारच नाहीत याची शाश्वती नाही. पोफळी चिपळूणकडे जाताना असलेल्या कुंभार्ली घाटाची परिस्थिती याहून बिकट आहे. एखाददुसरी शिळा घरंगळून रस्त्यावर येणे हा प्रकार पावसाळ्यात नेहमीच घडतो. परंतु वारंवार बसलेल्या धक्क्यांनी कड्यावरील अनेक शिळाखंड तर ढिले झालेच असणार परंतु घाटातील रस्ताही कित्येक ठिकाणी दगडी चिऱ्यांनी बांधलेला आहे. हे चिरे निखळले तर रस्ताच राहणार नाही. कड्याचा लहान मोठा भाग कोसळून रस्ता बंद होण्याची शक्यताही दुर्लक्षिता येणार नाही. [ धरणासमोरील गाढव खोप गावाचे बाजूला असाच एक प्रचंड शिलाखंड खालच्या एका छोट्या शिलेवर येऊन विसावला आहे व त्याच स्थितीत हे लोंबकळते प्रकरण किती काळ कंठेल हे सांगणे कठीण आहे. ] एकूण पावसाळ्यात आपले बाह्य जगाशी दळणवळण तुटले व निसर्गकोपाचा वेढा पडला तर कसे ही चिंता प्रत्येकजण करतोना दिसतो. जीवनावश्यक सर्व वस्तूंचा पुरवठा बाहेरून असल्या-

मुळे या चिंतेला खरी धार आहे.

धरणाची मजबुती करण्याचे काम रात्रंदिवस चालू आहे. हे काम करण्यासाठी एक खास भाग स्थापन झाला असून त्यांचे प्रयत्न अविरत चालू आहेत. वेचक ठिकाणी बोअरिंग मशिनने खोल छिद्रे पाडली जात असून त्यांत मजबूत पोलादी दोर [ ज्याला बाटली धुण्याच्या ब्रशाला जसे केस असतात तसे सर्व बाजूंनी पोलादी केस आहेत ] सोडण्यात येतात व मग ही छिद्रे खास रासायनिक द्रव्य-दाबाने फवारून (Chemical grouting ) अगदीं एकसंध शिळेसारखी मजबूतपणे बंद करण्यात येतात. असे हे मानवी प्रयत्न जोरदार चालू असले तरी त्यांना पूर्णपणे यश देणे हे त्या सर्व नियंत्रण करणाऱ्या शक्तीच्या अधीन आहे ही गोष्ट सर्वजण मानतात. त्या शक्तीबद्दल एवढी प्रकर्षपूर्ण जाणीव अन्यत्र कुठे असेल असे वाटत नाही. म्हणूनच डोळस प्रयत्न करीत असूनसुद्धा तिचे अधिष्ठान मिळवण्याची धडपड लहानथोर सर्व थरांत दिसते. इतके करूनही प्रतिकूल तेच घडले– धरणाला धोका उत्पन्न झाला– तर काय करावयाचे त्याची साधारण योजना आखलेली आहे. एका विशिष्ट पातळीखालची घरे, दुकाने हलविण्यात येत आहेत. प्रवाहाखालच्या अनेक गावांना टेलिफोनने धोक्याची पूर्वसूचना देण्याची तयारी ठेवलेली आहे व संबंधितांना सुरक्षित, उंच स्थळी हलविण्यात येणार आहे.

" परंतु ती वेळ न येवो. महाराष्ट्राची भाग्यविधाती भाग्य उजळीत तशीच ठिकाणी राहो. पानशेतनंतर हा तडाखा बसला, तेवढाच फार झाला. आता आणखी सत्त्वपरीक्षा नको. या कोयना निवासियांच्या प्रार्थनेत सर्व महाराष्ट्र, नव्हे उभा भारत, नक्कीच सामील होईल."

**कोयना वसाहतीतील एक**

# कुरघोडी

ल. शं. सबनीस



शाळेला सुटी पडली तसा मी गावी गेलो. कारण बोलून चालून प्राथमिक शिक्षक मी. मुलांना धुळाक्षरे शिकविणारा. नाहीतर पाढे सांगणारा— सुटीत मला पेपर तपासायचे नव्हते की कोणत्या परीक्षेवर पर्यवेक्षक म्हणून कामही करायचे नव्हते. त्यापेक्षा वृद्ध वडील कोकणात होते त्यांना सोबत तरी होणार होती. आई जाऊन तपावर अवघी लोटला होता. अण्णांना मी आणि धाकटा बाळकृष्ण ह्यांखेरीज कोणाची आशा नव्हती. ते आम्हा दोन मुलांना आपले दोन डोळेच समजत.

माझी पंचविशी चालली होती. आणि अण्णांच्या मनात माझ्या लग्नाचा 'बार' लवकरच उडवून द्यायचे घाटत होते. मी सोलापूरला एकटाच राही. खाणावळीतले अन्न खाई. हे अण्णांना आवडत नसे. आईच्या अकाली निधनामुळे मला हाती जेवण करायला येई. पण शिक्षकी पेशासारखा विशेष दगदगीचा पेशा नसूनही मी हाती जेवण करायची टंगळमंगळ करायचा. मला आचार्याचा धंदा जरी

मनापासून आवडायचा तरी आचाऱ्याचा आवडत नसे. घरी गेल्यानंतर पोटातल्या वैश्वानर अग्नीची शांती करण्यासाठी गार्हस्थ अग्नीची आराधना करून चूल, शेगडी किंवा स्टोव्ह पेटविणे व वर पुन्हा अन्न–ब्रह्माची सिद्धता करणे मला फावत नव्हते. त्याऐवजी खुशाल काहीतरी वाचीत बसावे व पोटींचे काक कलकलू लागले की, तयार भोजनाचे एखादे ठिकाण गाठून त्यांना पिंड द्यावे असाच उपक्रम मी अधिक पसंत करीत असे. पण त्यामुळे माझी प्रकृती खालावलेली आहे असे अण्णा म्हणत. मला ते मंजूर नव्हते. ते अण्णांचे दाखवायचे दात होते त्यांचे खावयाचे दात वेगळेच होते. त्यांची पत्नी निवर्तल्यामुळे त्यांना गृहलक्ष्मी म्हणून सून आणावयाची घाई सुटली होती.

मी गावी गेल्यानंतर लगेच त्यांनी आपल्या बेताची प्रस्तावना केली.

"काय रे नाना, अरे किती हा वाळलास ?"

"नाही हो अण्णा, माझी मूळची प्रकृतीच काटकुळी. तिथं वाळण्याचा प्रश्नच कुठं येतो ?"

"असे ना का काटकुळी ? पण अंगावर गुंजेसारखी लाली हवी का नको ? हा पालीसारखा फटफटीतपणा तब्बेत खाली आल्याचंच लक्षण आहे ! मूळ, माणसाला घरगुती, सुग्रास जेवण आधी पाहिजे असतं तेव्हा कुठं तब्बेती टिकतात महाराजा ! बाजारचं अन्न म्हणजे आजाराला बोलावणं ! तेव्हा आता लग्न करून टाक. वयही तुझं अगदी योग्य आहे. नोकरी छान आहे. आता बायकोही छानशी मिळव म्हणजे झालं !"

अण्णांची प्रस्तावना मात्र छान झाली. नंतर त्यांनी दोनच दिवसांत आपला माझ्या लग्नाबाबत मनसुबा जाहीर केला. म्हणाले–

"नाना !"

"काय ?"

"माझा एक प्लॅन आहे तुझ्या लग्नाबद्दल !" मी कान टवकारून व भुवया वर उचलून ऐकू लागलो. एक मिनिटभर ते काहीच बोलले नाहीत. मग म्हणाले,

"कोणता म्हणून नाही विचारलंस ते ?"

"माझं लक्ष आहे अण्णा ! बोला तुम्ही !"

"हे बघ, शेजारच्या गजाभाऊंची बेबी माहीत आहे ना तुला ? ती तुला बायको म्हणून ह्या घरात आणावी अशी माझी इच्छा आहे ! तिच्या बापाचीही इच्छा आहे ह्या घरात पोरगी पडावी म्हणून. घराणं व मुलगी आपल्या पूर्ण माहितीतली. मुलीला आई आहे. तेवढाच तुलाही आधार ! वळण कसं अगदी लाखातलं आहे मुलीला. हल्लीच अठरा पुरी झाली तिच्या वयाला. तेव्हा गजूही तिला उजवून टाकण्याच्या विचारात आहे. वाटल्यास तू एकदा बारकाईनं मुलगी त्या दृष्टिकोनातून पाहा. आपल्या दारावरनं जाते. तसं झालं, तर मी तिला बोला-

-वूनही घेईन. माझी बरीच कामंही करते ती सांगितलं की. तशी ती मोठी आज्ञाधारक आहे हो ! "

" पण अण्णा – " मी शंका काढली.

" काय ? "

" माझ्यासारखा यःकश्चित् मराठी शाळेतला एक मास्तर गजाभाऊ आपला जावई म्हणून पत्करतील ना ? तसंच बेबीलाही शाळामास्तर आपला नवरा म्हणून चालेल का ? "

" नाना ! हे असे नामर्दासारखे मला प्रश्न नको विचारूस ! अरे, मग आपल्या घराण्याची प्रतिष्ठा ती काय राहिली रे ? अरे हिंमत मर्दा तो मदत खुदा अशी एक उर्दू भाषेत म्हण आहे. हिम्मत घर. हिम्मत घर. उगीच शंका कुशंका नको, शिवाय गजाभाऊंनीही आपली इच्छा खुद्द मजजवळ व्यक्त केली आहे की मुलगी ह्याच घरात पडावी, ती अगदीच फुक्कट वाटते ? "

गजाभाऊंची बेबी मला पत्नी म्हणून मिळणे ही गोष्ट मला नापसंत असण्याचे काहीच कारण नव्हते. पण मला ते जरा काहीसे अवघड वाटे. तरी पण अवघड गोष्टीही जगात सिद्धीस गेलेल्या आपण पाहतोच, नाही का ? त्यातीलच ही एक असं म्हणून मी त्या बेबीची पुढं कशी काय उत्क्रांती होत आहे, तेच काळजीपूर्वक पाहण्याचे ठरविले.

दरम्यान, मी गावी आलो असून माझ्या लग्नाचा विचार अण्णा करीत आहेत. तेव्हा तुला रजा मिळणे शक्य असल्यास तूही अवश्य इकडं थोडे दिवस यावेस अशा आशयाचे पत्र मी माझा धाकटा भाऊ बाळकृष्णा ह्यास लिहिले. तो जळगाव येथे पोस्टात कारकून होता. परंतु आमच्या खेड्यातले लोक त्याला पोस्टमास्तर साहेब म्हणूनच ओळखीत. कारण त्याच्या हिशेबी प्रत्येक पोस्टात एकच कारकून असतो आणि तोच तिथला पोस्टमास्तर असतो. मी बाळकृष्णाला पत्र लिहिलं त्याचं कारण म्हणजे तो जळगावला व मी सोलापूरला. आमची भेट अलीकडे क्वचि-तच व्हायची. शिवाय त्याच्या व माझ्या वयात अवघे दोन वर्षांचेच अंतर होते साहजिकच त्यामूळे माझे त्याचे जणू काही बरोबरीच्या मित्रासारखेच नाते होते. तेव्हा त्याला मी असल्या गोष्टी आधी कळविल्या तर त्यात काहीच नवल नव्हते.

सुदैवाने बाळकृष्णाला एक महिन्याची रजा मिळू शकली व तो गावी आला. तोपर्यंत अण्णांनी जवळ जवळ साऱ्या गावातच जाहीर करून टाकले होते की आमच्या नानाचं लग्न यंदा आटोपायचंच. पुढं सिंहस्थही येतो आहे. म्हणजे त्या बिचाऱ्याचे जेवणाचे हालही वाचतील आणि धाकट्या बाळकृष्णाचीही लाइन क्लीअर होईल आणि हा अण्णांचा मनसुबा गजाभाऊंच्या तर सर्वांच्या आधी कानावर गेला. अलीकडे गजाभाऊंच्या आमच्याकडे वारंवर खेपाही होऊ लागल्या. तो आमच्याशी नाहीतर अण्णांशी तास न् तास गप्पा मारीत बसू लागला.

जसजसा गजाभाऊ आमचेकड येत होता तसतसा बेबीबद्दलचा माझा जिव्हाळा जास्तच वाढीस लागत चालला होता. आज ना उद्या गजाभाऊ आपल्या मुलीबद्दल अण्णांजवळ माझेसाठी विचारणा करील. आणि मग काय...सारंच कसं अगदी ठरलेलं...पूर्वनियोजित आणि अपेक्षित ! परिणामी मी बेबीकडं आशाळभूतासारखा पाही. तिच्याकडे पाहून हसण्याचा प्रयत्न करी. आणि आज ना उद्या गजाभाऊ आपले मुख उघडून मूळ विषयाला तोंड फोडतील असं मला बालंबाल वाटे.

असं होता होता तो दिवस उजाडला, " गजाभाऊ मुलगी दाखवायला आणणार आहेत. तू आधी मुलगी नीट पाहा व प्रामाणिकपणे पसंती अगर नापसंती रोखठोकपणे सांगून टाक ! " असं अण्णांनी जाहीर केलं ! मला काही समजेना. मी म्हटलं " अण्णा ! तुम्ही गजाभाऊंच्या बेबीबद्दलच ना विचारीत आहात ? "

" हे बघ नाना ! "

" काय ? "

" लहानांनी वडील माणसाचं नेहमी ऐकावं. मुकाट्यानं आज येणारी मुलगी तू पाहा. बेबी काय ? तू पहिलेलीच आहेस. दोन्ही मुलींतून तुला कोणती मुलगी पसंत पडली ते प्रामाणिकपणे आणि सत्याला स्मरून सांग ! "

मी गप्प बसलो. दुपारी गजाभाऊ, आणखी एक गृहस्थ व एक मुलगी असा परिवार आमचे घरी दाखल झाला. मी दिङ्मूढ झालो. मुलगी नक्षत्रासारखी होती. बेबीच्या मानानं काकणभर सरसच होती दिसायला. बरोबर असलेले तिचे वडील. तेही कुठंतरी दुय्यम शाळा मास्तरच होते. गजाभाऊ स्वत: एक रिटायर्ड स्टेशनमास्तर होते—रेल्वेचे ! अशी ही सगळी मास्तर मास्तरांची पर्वणी होती.

ती तसली मुलगी नाकारून मी गजाभाऊंच्या बेबीशी का लग्न करावं हेच मला समजेना. आणि अण्णांनीही बेबीलाच घरात आणण्याचा प्रथम अट्टाहास का म्हणून धरावा तेच मला समजेना. त्या नवागत मुलीला मी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरेही तिनं मोठ्या शालीनतेनं दिली. तितकी शालीनता मला गजाभाऊंच्या बेबीच्या ठिकाणी क्वचितच दिसली. कदाचित अति परिचयामुळे तसं असेल. कुलशीलाविषयी खुद्द अण्णा त्या मुलीविषयी ग्वाही घेत होते. मग मी मधल्या मधे विनाकारण खळखळ कशाला करू ? मी पसंती दर्शविली.

पण खरी मजा पुढंच आहे. मी ती मुलगी पसंत केली आणि गजाभाऊंच्या हालचालीची सूत्रे भराभर फिरू लागली. बाळकृष्णाला आपली बेबी दाखविण्याचा फार्स झाला. बाळकृष्णानं ती पसंत केली. आणि दोन्ही लग्ने एकाच शुभ मुहूर्तावर करण्याचे मुक्रर करण्यात आले.

एके दिवशी माझी पँट समजून चुकून मी बाळकृष्णाचीच पँट घातली. पँटच्या खिशात रुबाबानं हात घातला; तो एक पत्र हाती लागले. आंतरदेशीय असं ते पत्र बाळकृष्णाला जळगावच्या पोस्टाच्या पत्त्यावर पाठविलेलं दिसलं. ही घडी उलगडून

वाचावे का ? असा मला प्रश्न पडला. खरं असं होतं की, मी व बाळकृष्ण ह्यांत लपविण्याजोगं रहस्य काहीच नव्हतं. दोघामधोमध गुप्ततेची भिंत अशी नव्हतीच. तेव्हा वाचावं हे पत्र. कदाचित बाळकृष्ण स्वत: होऊन मला हे पत्र दाखवायला विसरला असेल. त्यानं तरी किती किती म्हणून गोष्टी लक्षात ठेवायच्या हो ! तेव्हा हे पत्र आपण खुशाल वाचावे, असा पोक्त विचार करून मी पत्र वाचले–

" प्रिय बाळकृष्णा यास–

मी हे पत्र अत्यन्त धाडस करून लिहीत आहे. वास्तविक परक्याच्या अविवाहित मुलीनं हे असं धाडस करू नये; पण उभ्या आयुष्याचा प्रश्न पडला आहे. म्हणून लिहीत आहे. त्याचा पूर्ण विचार करून निर्णय घ्यावा व ती. बाबांना (गजाभाऊंना) तुम्ही असे पत्र लिहावे की मी तुम्हांला काही सुगावा लागू दिला आहे असं तर दिसू नये; पण त्यांच्या इकडील हालचाली मात्र बंद पडाव्यात.

स्पष्ट लिहिते की, मी तुमच्या घरात पडावी ही आमच्या बाबांची इच्छा. तुमच्या अण्णांचीही तशीच इच्छा, इथवर सारं ठीक आहे पण माझ्या मनात तुमचे नानांशी लग्न करावयाचे नाही. मला शाळामास्तरची नोकरी आवडत नाही. त्यातून ते आहेत मराठी शाळामास्तर ! स्पष्ट लिहिल्याबद्दल क्षमा असावी. त्यापेक्षा मी तुमच्याशी लग्न करण्यास तयार होईन–अर्थात तुमची पसंती असेल तरच ! नाही तर निदान तुम्ही माझ्या वडिलांना खुबीनं कळवून ते ह्या फंदात न पडतील असं करा ! ते मी तुमच्यावर सारं सोपविते. पण कोणत्याही परिस्थितीत मी तुमच्याशी पत्रव्यवहार केला आहे हे त्यांना कळता उपयोगी नाही. यापेक्षा जास्त काय लिहू ?

आपली (असहाय)
बेबी '

माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. सगळ्या घडामोडी कशा बिनबोभाट पार पडल्या होत्या ! पण बाळकृष्णाच्या मनात मला हे पत्र दाखवायचे नव्हते मग माझा अट्टाहास का ? त्याला हे कळायलाच नको होतं म्हणून मी ताबडतोब आधी पँट बदलली. त्याचं ते पत्र होतं तसं त्या पँटमधेच ठवून दिलं. आणि मग माझ्या लक्षात आलं की, अण्णा एक दिवस पुटपुटत होते–" गजाभाऊंची बेबी बाळकृष्णाच्या मानानं थोडी घोडी वाटते ! पण आता त्याचा काय उपयोग ?" कारण उघड होतं अण्णांच्या अशा बोलण्याचं–सारीच कुरघोडी झाली होती !

O

पुस्तके

त्रिशंकू
चि. त्र्यं. खानोलकर
मौज प्रकाशन गृह
मूल्य : ११ रुपये
पृष्ठे : २२४ (डेमी)

संजीवनी
सौ. चंद्रप्रभा जोगळेकर
मेनका प्रकाशन
मूल्य : ८ रुपये
पृष्ठे : २५९ (क्राउन)

देवाचा शब्द
मनोहर शहाणे
मौज प्रकाशन गृह
मूल्य : ६·७५ रुपये
पृष्ठे : ११८ (डेमी)

# तीन कादंबऱ्यांच्या तीन तऱ्हा

चिं. त्र्यं. खानोलकर यांनी कादंबरी-लेखनाचा धडाका लावलेला दिसतो. अलीकडच्या काही वर्षांतच त्यांनी 'रात्र काळी घागर काळी', 'अजगर', 'कोंडूरा' आणि आता 'त्रिशंकू' अशा कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या कादंबऱ्यांची नाडी वात-पित्त-कफात्मक नेहमीच्या प्रकृतिमानासारखे निदान करण्यासारखी नाही. त्यांच्या कादंबरीतील माणसे कुठल्या तरी विकृतीने पछाडलेली असतात. अशा एखाद्या विकृतीने शरीर-मनाचा ताबा घेतला म्हणजे त्याचा जो मानव तयार होतो असे मानव (स्त्री-पुरुष) खानोलकरांच्या कादंबऱ्यांतून वावरत असतात.

अशी सात आठ दहा माणसं एकत्र केली की पाहता पाहता ही माणसं आपले एक निराळेच जग निर्माण करतात. ज्या पृथ्वीच्या पाठीवर, ज्या परिसरात ही माणसे वावरतात तो परिसर त्याच्या वावराने झपाटला जातो. एखाद्या गावाला प्लेगची लागण झाली, की अगोदर तिथल्या माणसांची मानसिक घडण बदलते. त्या पाठोपाठ त्यांचे शारीरिक अंग-विक्षेपही बदलतात. फार बारकाईने पाहिल्यास हा बदल हमखास दिसून येतो. आणि त्यानंतर मग तेथील अवघे वातावरणही बदलून जाते. झपाटल्यासारखे दिसू लागते. वास्तविक वातावरणाला, तिथल्या परिसराला काही-

देखील झालेले नसते. त्यांना काही प्लेग झालेला नसतो. हा बदल म्हणजे मानसिक परिणामाचा निष्कर्ष असतो.

खानोलकरांच्या कादंबरीची तुलना वरील दृष्टान्त देऊनच करणे श्रेयस्कर ठरते. कारण वरील उदाहरणांत माणसामध्ये आणि भोवतीच्या वातावरणामध्ये प्लेगसारखा रोग परिवर्तन घडवून आणतो, तर खानोलकरांच्या कादंबऱ्यांत मानसिक विकृती हा रोग परिवर्तन घडवून आणतो.

खानोलकरांच्या कादंबऱ्यांचा स्थायीभाव असणारी ही विकृती त्यांच्या कादंबऱ्यांत अनेक रूपांनी वावरत असते. कधी ती शारीरिक व्यंगात्मक असते तर कधी नात्यां-विषयीच्या गल्लतीने ती निर्माण होते. कधी ती पात्रांमध्ये असणाऱ्या समाजशक्तीच्या दुबळेपणातून जन्म घेते तर कधी; म्हणजे बहुशः ती लिंगविषयक विकृतभावनेतून निर्माण होते. त्यांच्या बहुतेक कादंबऱ्यांतून ही विकृती लिंगविषयक अस्वाभाविक व्यवहारातून निर्माण झालेली आहे. 'रात्र काळी घागर काळी' आणि 'अजगर' या कादंबऱ्या त्याचे ठळक उदाहरण म्हणून देता येईल.

परंतु असे असले तरी खानोलकरांच्या कादंबऱ्यांतून याच व्यवहाराचे दर्शन घडत असते असे म्हणता येणार नाही. आणि दुसरे असे की केवळ याच विकृतीने आणि वखवखत्या लैंगिक बहारीने त्यांची कादंबरी बरबटलेली नसते. असे असते तर तिला कलाकृतीचे रूप आणि महत्त्व लाभले नसते. खानोलकरांच्या कादंबरीला ही दोन वैशिष्ट्ये लाभलेली आहेत. म्हणूनच त्यांची कादंबरी समजून घेणे आणि समजून सांगणे गुंतागुंतीचे आणि कठीण झालेले आहे. त्यांच्या कादंबरीतून जीवनाच्या अर्थाचे मोजमाप करण्यासाठी नेहमीच्या फूटपट्ट्या उपयोगी पडत नाहीत. कारण त्यांच्या कादंबरीतून जे जीवन रूप घेऊन आलेले असते त्या जीवनाचे तर्कशास्त्र, नीतिशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र आणि अर्थशास्त्र वेगळेच असते.

## कोलमडलेली 'त्रिशंकू'

उदाहरणार्थ त्यांच्या 'त्रिशंकू' मधील नान्याच्या जीवनाला आपले नेहमीचे अर्थशास्त्रीय सिद्धान्त लागूच पडत नाहीत. नान्याला पैसा कुठून मिळतो हे जसे कोडे आहे तसेच त्याचा पैसा कशावर खर्च होतो आणि तो का खर्च होतो हेदेखील कोडेच आहे. वास्तविक पाहता कलाजीवनाच्या विकासात माणसाच्या अर्थविषयक जीवनाला महत्त्व आहे. म्हणजे असे की प्रत्यक्ष अर्थव्यवहार होत असताना किंवा होत नसताना त्याचे दर्शन कलाकृतीत घडावे असे मुळीच नाही. मात्र कलेतून विकसित होत जाणाऱ्या जीवनाच्या पोषणात तत्कालीन अर्थजीवनाचा आलेख काढता आला पाहिजे. हे जसे आर्थिक जीवनाच्या प्रवाहांचे आहे त्याचप्रमाणे मी वर निर्दिशित केलेल्या इतर प्रवाहांचे आहे. किंबहुना मानवी जीवन या सर्व प्रवाहांचा निष्कर्षच असते. माणसाच्या जीवनाचे प्रमुख घटक दोन आहेत. एक त्याचे बौद्धिक जीवन आणि दुसरे मानसिक जीवन. बौद्धिक जीवनाच्या प्रकाशात मानसिक जीवनाचे

पोषण आणि विकास होत असतो. बुद्धीचा विकास जेवढा मर्यादित तेवढे त्याचे मानसिक जीवन अधिक भावनाप्रधान असते.

खानोलकरांच्या कादंबरीत जीवनाचा हा तोल सांभाळला गेलेला दिसत नाही. आणि दुसरे असे की समाजात वावरणाऱ्या माणसाच्या जीवनातील तर्कसंगती आणि कलाविश्वातील तर्कसंगती ही वेगवेगळ्या मूल्यांवर आधारित असते याचे अवधान कादंबरीकार खानोलकर यांना आहे असे दिसत नाही. त्यांच्या कादंबरीत कित्येक वेळा तर या दोन्ही तर्कसंगती एकमेकींवर आक्रमण करताना दिसतात. आणि तिथे त्यांची कला पराजित होते. 'त्रिशंकू' मध्ये अशी उदाहरणे खूप सापडतात. एकीकडे त्रिशंकूतील 'नान्या' कादंबरीकाराने निर्माण केलेले वेगळे विक्षिप्त जीवन जगत असतानाच दुसरीकडे केव्हा तरी हा भंकस माणूस नेहमीच्या जमिनीवर पाय ठेवतो आणि नेहमीसारखे अंगवळणी पडलेले विचारदेखील बोलतो! साळुंके नान्यास 'अरे तुरे' म्हणतो तेव्हा नान्या त्याला म्हणतो,

"'अरे' म्हटलेलं मला आवडत नाही. आपण काही मित्र नाही."

"मित्र नव्हेच आपण. खरं आहे तुझं." साळुंके.

"पुन्हा तुझं, तू–मी शिव्या देईन." नान्या.

या संवादातून नान्याच्या सामान्य पातळीवरील माणसाच्या अपेक्षा आहेत. आणि तेथेच शिव्या देण्याची ही धमकी आहे. ( त्रिशंकू पान १७१ )

याचा गर्भ सुशीच्या पोटात वाढतो. सुशी कुमारिका आहे. ती काशी नावाच्या जन्मसवाष्णीची मुलगी आहे. नान्याचं सुशीवर प्रेम आहे, आणि शकूचं नान्यावर प्रेम आहे. वास्तविक सुशी आणि शकू एकाच बापाच्या पण दोन आयांपासून झालेल्या दोन मुली. सगळे संबंध अनैतिक. नान्याने सुद्धा सुशीशी अनैतिकच संबंध केला. अर्थात त्याचं तिच्यावर निखळ प्रेम होतं म्हणून केला. केशवदाजीचं असं प्रेमबिम काही नव्हतं. केशवदाजी या दोन मुलींचा बाप. त्याने जे काही केलं, काशीबरोबर व्यवहार ठेवले ते आगीपोटी. नान्यानं प्रेमापोटी. कादंबरीकाराने कादंबरीला वजन प्राप्त करून देण्यासाठी नान्याच्या लैंगिक व्यवहाराला मिळवून दिलेली हीच एकमेव तथाकथित नैतिक बैठक, परंतु नान्याच्या प्रकृतीला हीच एक बैठक पुरत नाही, त्याचं मन शकूकडेही ओढ घेतं. आपण केलं हे बरोबर का चूक याचीही त्याला अनेकदा भ्रांत पडते. कादंबरीच्या शेवटी शेवटी तर भ्रमच होतो. नान्यालाही होतो आणि लेखकालाही होतो. कारण कादंबरीच्या मध्यापर्यंत कसे तरी ओढत ताणत आणलेले चंद्रबळ शेवटी शेवटी उन्मळून पडते. आणि एका चांगल्या ताकदीने निर्माण होऊ पाहात आहे असं वाटायला लावणारी ही 'त्रिशंकू' साफ कोलमडून पडते. वाचकाच्या मनातूनदेखील हरवून जाते.

आणि या अपयशाचं कारण म्हणजे कलंदर वृत्तीच्या नावाखाली लेखकाने कलेशी केलेला व्यभिचार आणि आपणच निर्माण केलेले भस्मासुरी जीवन स्वतः पेलण्याची लेखकामध्ये नसलेली ताकद!

खानोलकरांच्या ' त्रिशंकू ' तील जीवन जसे अनिबंध आणि स्वैर आहे, जीवनाच्या बाबतीत त्याच जातीची दुसरी एक कादंबरी इथे माझ्याजवळ आहे. ही कादंबरी मराठीला जेवढी परकीय आहे तेवढीच तिची लेखिका मराठी वाचकांना अपरिचित आहे. सौ. चंद्रप्रभा जोगळेकर हे नाव मराठी ललित साहित्याच्या क्षितिजावर अगदी नवीन आहे.

एका महाराष्ट्रीय स्त्री –लेखिकेने आपल्या कादंबरीसाठी निवडलेला विषय मराठी साहित्याला एवढा परकी (!) आहे आणि धीट आहे की केवळ विषयासाठी तरी लेखिकेची तारीफच करायला पाहिजे ! एवढ्या समृद्ध आणि विशाल अनुभूतीने मराठी लेखक संपन्न होऊ लागले (त्यातून स्त्रिया) तर मराठी साहित्याला खरोखरच फार चांगले दिवस आले असे म्हटले पाहिजे !

## ' संजीवनी 'तले लोकविलक्षण जीवन

या कादंबरीचे नाव आहे ' संजीवनी. ' तिचा विषय थोडक्यात असा : सुभाष हा एक तरुण पायलट असतो; कॅप्टन एस्. डी. मुळगावकर हा मंदा नावाच्या तरुणीचा लहानपणीचा खेळगडी निघतो. ऐन तारुण्यात यांची भेट विमानात होते. मंदा लंडनला चाललेली असते आणि त्याच विमानाचा कमांडर मुळगावकर असतो. '

कादंबरीचे पुढचे सारे कथानक भारताबाहेर घडते. सुभाषचे लग्न झालेले असते. आणि पुढे त्याला षंढत्व आलेले असते. आश्चर्य असे, की या सुभाषच्या पुढ्यात तरुण मुलींचा अक्षरश: खच पडलेला असतो. त्याच्याकडून उपभोग घेण्यासाठी या साऱ्यांची शरीरे जणू आसुसलेली असतात. इतकेच नव्हे तर उच्च शिक्षणाला गेलेली कुमारी मंदा हीदेखील त्याच्यावर फिदा होते. वेळी अवेळी त्याच्या विशाल छातीवर आपले डोके घासते, चुंबनासाठी आपले ओठ पुढे करते आणि एकान्तात (परदेशांत) त्याच्या अंथरुणात रात्रभर झोपते. अशा प्रसंगांतून जाऊनही सुभाष कोरडाच कसा राहतो ? तिला वाटत होतं त्यानं आपल्याला जवळ घ्यावं, आप त्याला उराशी घट्ट आवळावं, उत्तेजित झालेल्या शरीराला आवळून दाबून टाकावं.

या कादंबरीच्या जगात नीतितत्त्वांचो दिशा कोणती आहे याची कल्पना वरील विवेचनावरून आली असेलच. परंतु अधिक खुलाशासाठी कादंबरीतील एक लहानसा संवाद खाली देतो म्हणजे अधिक स्पष्ट कल्पना येईल.

" सुभाष, प्रेमाची परिणती कशी व्हावी असं वाटतं तुम्हांला ? "

" मंदा, स्त्री-पुरुषांचं प्रेम केवळ मानसिक असू शकत नाही, जे असतं ते टिकत नसतं. खऱ्या प्रेमाची सांगड शारीरिक आकर्षणाशी असते......स्त्री-पुरुषांच्या प्रेमाला शारीरिक मनोमीलनाखेरीज साफल्यच नाही ! "

" नीतितत्त्व काही आहेतच की नाही ? "

" नीतितत्त्वं प्रत्येकाची वेगळी असतात. माझ्यासारखे उपभोगाला प्राधान्य

देतात. तुझ्यासारखे रूढीला चिकटून बसतात. देह आहे, त्याला वासनेची व्याधी जडलेली असते, त्यावर उपचार करणं हा काही गुन्हा समजत नाही मी ! "

" शारीरिक सुख पतिपत्नीतच असावं.... कोणाशीही शय्यासोबत करणं म्हणजे नीतिबाह्यच नाही का ? "

" कुठलीही मुलगी आकर्षणाखेरीज काही राजी होत नसते. "

" मला वाटतं, समागम हा प्रीतीचा दुवा खरा, (युगप्रवर्तक फडकेछाप वाक्य) पण तो कायद्यानं मान्य अशा पतिपत्नीतच असावा ! ते पावित्र्य इतरत्र कुठे असणार नाही ! "

" भूक लागली की आपण ब्राह्मणाच्या हातच्याच स्वयंपाकासाठी अडून बसत नसतो. सोवळं कुठपर्यंत ? जोपर्यंत बंधन त्रासदायक होत नाही तोपर्यंत ! ... "

अशा या अक्षरशः मुक्त संवादांनी 'संजीवनी' ही कादंबरी खच्चून भरली आहे. मंदा नावाच्या कुमारिकेला (वैवाहिक) सुभाष अगदी जवळ यावासा वाटत असतो. म्हणजे जे पुरुषांनी स्त्रीच्या बाबतीत इच्छावं, करण्यासाठी धडपडावं ते सारं काही इथे स्त्रिया करतात. अर्थात त्यात अस्वाभाविक असं काही नाही. परंतु ही जी प्रवृत्ती या कादंबरीत उदय पावते तिचा विकास आणि परिणती कादंबरीतल्या विश्वाशीच सुसंगत राहात नाही हे तिचं अपयश आहे. कारण असं की जेव्हा हा सुभाष षंढतेच्या अवस्थेत असतो तेव्हा मंदाच्या शारीरिक आणि मानसिक तशाच लैंगिक चाळव्यांना अमाप उधाण येते; मात्र याचे षंढत्व जाण्यासाठी डॉ. हार्ट जेव्हा या मंदाला तिच्या उपभोगाची सुभापला गरज लागेल असे सांगतात तेव्हा मात्र तिचं खरं, (म्हटल्यास भारतीय) स्त्रीत्व खडबडून जागं होतं आणि या भावनेला कडाक्याचा विरोध करते. यासाठीच मी वर मंदाच्या वागणुकीस 'चाळे' हा शब्द वापरला. कारण जो एक मुक्त, सुदृढ केवळ निस्सीम प्रेमावर आधारलेली भोगविषयक नैतिक भावना या कादंबरीत कलाबद्ध करण्याचा प्रयत्न जोगळेकर-बाईंनी केला आहे, त्याची उत्कटता, सत्यता आणि प्रामाणिकपणा यांचा आलेख त्यांना मंदाच्या जीवनात सुसंगतपणे काढता आलेला नाही. त्यामुळे ही कादंबरी फसते; इतकेच नव्हे तर हास्यास्पद वाटते.

वास्तविक जे लोकविलक्षण जीवन आपल्या कादंबरीसाठी उचलण्याची बाईंनी प्रतिज्ञा केलेली आहे ते जीवन एखाद्या शिवधनुष्यासारखं आहे आणि हे शिवधनुष्य जोगळेकरबाईंना संपूर्ण सामर्थ्यानिशी उचलता आलेलं नाही. शेवटी कादंबरीतील हे जीवन एका विलक्षण हकीगतीच्या, अद्भुत गोष्टीच्या, सामान्य वाचकांना प्रलोभने दाखविणाऱ्या सवंग लैंगिक प्रसंगांच्याच सपाट पातळीवर अडकून पडते.

शेवटी जोगळेकरबाईंचं कौतुक वाटते ते या धाडसी विषयाला त्यांनी निडरपणे हात घातला याचं आणि वाईट वाटतं ते अशासाठी की एका चांगल्या विषयाला (!) मराठी कलाकृतीत न्याय मिळाला नाही म्हणून !

८ जून १९६८

तिसरी कादंबरी 'देवाचा शब्द' श्री. मनोहर शहाणे यांची. हिला कादंबरी न म्हणता एक दीर्घकथाच म्हणावे लागेल. दीर्घकथासुद्धा एवढ्याचसाठी की हल्लीच्या कथा फार लहान असतात म्हणून! अर्थात आकाराने लहान. नाहीतर 'देवाचा शब्द' या कादंबरीला कथा म्हणण्यास काहीच हरकत नाही. हल्लीच्या काही (गुणवान) कादंबऱ्या तशा आकाराने लहानच आहेत. त्याच जातीतली 'देवाचा शब्द' ही कादंबरी सर्वतोपरींनी त्याच जातीची म्हटले तरी चालेल.

आमच्या मराठी कादंबरीत विषय प्रामुख्याने दोन प्रकारचेच येतात. एक सामाजिक आणि दुसरा ऐतिहासिक! वास्तविक सामाजिक कादंबरीचा परीघ तसा फार मोठा आहे. परंतु या प्रांतात ठराविक चाकोरीच्या बाहेर मराठी कादंबरीची मजल गेलेली नाही. पांढरपेशाच्या जीवनातील, तेही काही अगदी ठराविक विषय निवडून मराठी कादंबरीकार आपल्या कादंबऱ्या लिहितात. थोडासा बदल म्हणून तिच्यात कोकणी, माणदेशी किंवा वऱ्हाडी जीवन येईल. काही वेळा हे परिसर वातावरणात ताजेपणा आणण्यासाठी निवडले जातील तर काही वेळा विषयाचे ते दारिद्र्य झाकण्यासाठी येतील. परंतु त्यामुळे मराठी कादंबरीत येणाऱ्या जीवनात संपन्नता आलेली आहे असे होत नाही. विषयाचे दारिद्र्य झाकण्याचा आणखी एक असाच प्रयत्न हल्लीच्या कथेत आणि कादंबरीत होत असतो. तो होतो भाषेच्या आणि निवेदनाच्या बाबतीत. त्याच त्याच, चघळून चोथा झालेल्या विषयातीलच बारीक बारीक छटा, पैलू निवडावयाचे आणि नव्या शब्दप्रयोगांनी, नव्या प्रकारच्या वाक्यरचनेने, नव्या शैलीचा अंगीकार करून वरील विषयांच्या चोथ्याला नवीन झळाळी द्यावयाची!

वरील मी उदाहरणे दिलेल्या कादंबऱ्यांच्या बाबतीत हेच झालेले आहे. तेच धर्मविषयक, तेच प्रेमाचे, तेच वैफल्याचे, तेच कोंदटलेल्या स्त्री-पुरुष संबंधाचे जुनेच परिघ लहान मोठ्या आकारात मांडून अत्याधुनिक, चटपटीत आणि प्रा. वा. ल. कुलकर्णी म्हणतात त्याप्रमाणे तरतरीत पद्धतीने मांडावयाचे.

'देवाचा शब्द' या कादंबरीतील विषय असाच जुना, जीर्ण, सनातन आहे. मूल न होणाऱ्या स्त्रीच्या व्यथेची ही कथा आहे. एकदा हा विषय निवडला की त्याच्या मदतीला ज्या गोष्टी हव्या असतात त्या येथे ओघानेच आल्या आहेत. तो नवरा, ती सासू, तो समाज, ते डॉक्टर, ते प्रारब्ध; सारे काही! या कथेला असे अनेक पैलू आहेत; अनेक पदर आहेत: अगदी वाचताना कंटाळा यावा, चांगल्या रसिक, जाणकार वाचकाच्याही डोळ्यात झोप भरावी इतका हा विषय आता मराठी वाङ्मयात परिणामकारक झालेला आहे. या कादंबरीची ११८ पाने वाचताना अनेक वेळा झोपेने डोळे भरून आलेले आहेत. हे या कादंबरीचे अपयश. परंतु तरीही ही कादंबरी वाचून संपवावीशी वाटली हे तिचे यश. हो, यशच म्हणावे लागेल! ◻

**वि. शं. पारगावकर**

# भारतीय मुस्लिम

# आव्हान
# आणि
# आवाहन

? ? ? ? ? ?

गेल्या आठवड्यातील गोष्ट. चर्चगेटचा विभाग. दुपारची वेळ. अचानकपणे भाईजी भेटले. भाईजी म्हणजे आपले प्रि. ए. बी. शहा. ' इंडियन कमिटी फॉर कल्चरल फ्रीडमचे ' सरचिटणीस शहा.

शहांना पाहिले की खूप बरे वाटते. सतरा गोष्टींत गुंतलेला हा माणूस. पण कोणी ओळखीचा भेटला की आगत–स्वागत करावयास विसरत नाही. परवा शहा भेटले तेव्हा वाटले त्यांच्याशी श्रीशंकराचार्य किंवा ' पुरुषसिंहां 'विषयी बोलावे लागणार. शहासाहेबांचा काही नेम नाही. ' पुरुषसिंह ' कवितेबद्दलही ते एखादा परिसंवाद भरवतील. चक्क पाडगावकरांना अध्यक्ष करतील.

शहा म्हणजे खरोखरच एक मिशनरी आहेत. पाश्चात्त्य विचारांनी भारलेले एक जातिवंत भारतीय मिशनरी ! मॅट्रिकला विद्यापीठात पहिले आलेले शहा, कॉलेज जीवनात रॉयिस्ट बनले. पुढे ते महाराष्ट्रीय बनले. आणि होय, आता ते आंतरराष्ट्रीय बनलेत.

परवा, शहांनी भेटल्याभेटल्या एक पुस्तक हातात दिले. मध्यंतरी शहांनी ' इंडियन सिक्युलर फोरम ' म्हणून एक संस्था काढली. या फोरममध्ये हमिद दलवाईपासून जनसंघाच्या प्रा. कानिटकरांपर्यंत साऱ्यांना त्यांनी ओढलंय. या फोरमच्या पुरस्काराने प्रसिद्ध झालेले ते पुस्तक. पुस्तकाचे नाव ' भारतीय मुस्लिम : आव्हान आणि आवाहन. '

पुस्तकाला ' भारतातील अल्पसंख्याकांचा प्रश्न ' असे काही हळवे नाव नाही याचे बरे वाटले. पण खरं सांगू, पुस्तक हातात घेतल्या घेतल्या वाटले, अरे, भारतातील मुसलमानांचा कसला आलाय प्रश्न. ' भारतीय हिंदू : आव्हान आणि आवाहन ' असे काही पुस्तक या लोकांनी लिहावयास पाहिजे.

पुस्तक हातात घेतले आणि रेल्वेत चढलो. रेल्वेतून उतरलोच नाही. चर्चगेट ते बोरिवली, बोरिवली ते चर्चगेट आणि पुन्हा चर्चगेट ते गोरेगाव. इतक्या फेऱ्यांत पुस्तक 'निवान्तपणे' वाचून संपविले. याचे सारे श्रेय पुस्तकाच्या सुबोध भाषांतराला आणि मांडणीला. प्रथम 'उर्दू प्रेस' मध्ये प्रसिद्ध झालेले एस्. इ. हसनेन यांचे हे लेख. प्रत्येक लेख तसा सुटा. पण पंचतंत्रातील गोष्टींप्रमाणे ही प्रकरणे सुटी असूनही सुटी वाटत नाहीत.

शहांची प्रस्तावना, आणि त्या प्रस्तावनेशी असलेले हसनेन यांचे मतभेद ही या पुस्तकाची खास वैशिष्टये. प्रस्तावनेत शहांनी एक वेगळा मुद्दा मांडलाय. फार चांगल्या प्रकारे. " फाळणीमुळे इस्लामच्या जगातही एक अभूतपूर्व घटना घडलेली आहे. आतापर्यंत मुसलमान जेते वा जीत या दोनच नात्यांनी इतर धर्मीयांशी वागत होते. जेथे ते जीत असत तेथे जेते बनावे हीच त्यांच्या धर्माची प्रेरणा होती. भिन्न धर्मीय समाजात राहून स्वातंत्र्य उपभोगणे व स्वातंत्र्याच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारणे ही गोष्ट इस्लामला नवी आहे. फाळणीनंतर भारतातील मुसलमानांना एक गोष्ट स्वीकारावी लागली. अन्य धर्मीयांबरोबर बरोबरीच्या नात्याने वागून सर्वांचा समान विकास करण्यास ते प्रतिज्ञाबद्ध झाले. म्हणून मुस्लिम समाजाच्या मागासलेपणात ज्यांचे हितसंबंध गुंतलेले नाहीत अशा धैर्यशाली नव्या नेतृत्वाची आज मुस्लिम समाजाला खरी गरज आहे. गेल्या दीडशे वर्षांतील इस्लामच्या अधःपतनाला जबाबदार असलेल्या समजुती, प्रवृत्ती व संस्था यांची शास्त्रीय दृष्टिकोनातून चिकित्सा करणे अगत्याचे आहे. १९ व्या शतकात हिंदूंच्या पुनरुत्थानाच्या नेत्यांनी हेच केले. " प्रि. शहांच्या प्रस्तावनेतील बहुतेक सारे विचार असे स्पष्ट, सडेतोड आणि पटण्यासारखे आहेत. पण हसनेन यांचे सारे लेख काळजीपूर्वक वाचल्यावर ... "श्री. हसनेन आपल्या शक्तिनुसार या दिशेने कार्य करीत आहेत." या प्रि. शहांच्या मताशी सहमत होणे मात्र कठीण आहे.

हसनेन यांच्या विचारांकडे वळण्यापूर्वी आणखी एका गोष्टीची नोंद घेणे अगत्याचे आहे. या पुस्तकाचे भाषांतर दृष्ट लागण्याइतके सुंदर जमलेले आहे. मराठीत इतके चांगले अनुवाद पाहावयास मिळत नाहीत. शास्त्रीय आणि वैचारिक वाङ्मयांत तर मुळीच नाहीत. पण हा अनुवाद ज्याने केला, त्याचा नामोल्लेखही पुस्तकात नाही. पुढील आवृत्तीत हा दोष सुधारला जावा. साऱ्या भाषांतरात दोन गोष्टी मात्र खटकतात. 'इंडियन सेक्युलर फोरम' हा शब्द सदैव कायम ठेवलेला आहे. 'सेक्युलर' या शब्दाला मराठीत योग्य प्रतिशब्द नाही, यावर एक सुंदर विवेचन प्रथम करून तो शब्द कायम ठेवणे कसे अगत्याचे आहे हे प्रथम पटवून दिले आहे. यात तसे बघता चूक काही नाही. किंबहुना भाषांतरात असा प्रामाणिक प्रयत्न करणे अगत्याचे असते. पण या विवेचनाच्या संदर्भात पुस्तकाचे नाव चांगलेच खटकते — 'Indian Muslims, Challange and opportunity' याचे हे लोक 'भारतीय

मुस्लिम' असे भाषांतर का करतात? 'भारतीय मुस्लिम' हा शब्द 'लाल पितांबर' या शब्दाप्रमाणे या लोकांना खटकत नाही का? 'भारतीय' या शब्दात हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन – या देशात राहणारे सारे – जे या देशाला पितृभू आणि पुण्यभू मानतात त्यांचा समावेश होतो; किंबहुना ज्या वेळी आपण भारतीय शब्द वापरतो तेव्हा हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन हे शब्द नाहीसे होतात. अनेकांना हा उगाच शब्दाशी खेळ करणे वाटल. पण जे लोक 'इंडियन सेक्युलॅरिझम' या शब्दाशी खेळ खेळतात त्यांच्याबाबत हा विचार सोडून देण्यासारखा खास नाही.

## हसनेन यांचे विचार

हसनेन यांचे विचार इतके नवे आणि प्रक्षोभक आहेत, की त्यांचा परिचय करून देणे कठीण आहे. जातीयवादाच्या भुताशी शर्थीने झुंज देऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक भारतीय मिशनऱ्याने हे पुस्तक त्यासाठी मुळातच वाचले पाहिजे. जमल्यास संग्रही ठेवले पाहिजे. मुस्लिम समाज झपाट्याने मागे पडतो आहे हे हसनेन यांचे प्रमुख दुःख आहे. 'एस्. एस्. सी.' परीक्षेत अनेक वर्षांत पहिल्या पन्नासात मुसलमान मुलगा नसावा याचे त्यांना प्रामाणिक दुःख होते. परीक्षक पक्षपाती नाहीत हे त्यांना मान्य आहे. मुसलमानांचेच मुळात काही तरी चुकते आहे. पण हे सारे सांगत असतानाच हसनेन यांना आणखीही काही सांगावयाचे आहे.

सेक्युलॅरिझमला विरोध करण्याच्या पायावर हिंदू व मुस्लिम जातीवादी शक्तींत समझोता झाला आहे हा हसनेन यांचा एक सिद्धान्त आहे. [प्रस्तावनेत शहा म्हणतात त्याप्रमाणे हसनेन यांनी पुस्तकात याचा पुरावाही दिलेला आहे. मला साऱ्या पुस्तकात हा 'पुरावा' कोठे आढळला नाही. कोणा वाचकाला तो आढळल्यास त्याने मला तसे जरूर कळवावे.]

मात्र या संदर्भात त्यांनी खूपच प्रक्षोभक विधाने केलेली आहेत. नानाजी देशमुख यांचा जमाते इस्लामला आशीर्वाद आहे असाही एक शोध त्यांनी लावला आहे [पृ. ८५] 'जनसंघातील मुस्लिम सदस्यांच्या पूर्वपीठिकेचे संशोधन करा' 'समान नागरिकत्वावर आधारलेल्या सेक्युलॅरिझमबद्दल मुळीच आदर नसणाऱ्या मुस्लिम पक्षांनी जनसंघाशी संगनमत करून त्याला काही मुस्लिम सदस्य पुरविले असण्याची शक्यता आहे.' [पृ. १४०] असली बेफाम विधाने वाचून हसनेन यांच्या एकूण वैचारिक भूमिकेची कीव येते.

जमाते इस्लामवर हसनेन यांनी पुस्तकात खूप कोरडे ओढले आहेत. याबाबत हसनेन यांचे विचार तसे स्पष्ट आहेत. पण हसनेन यांचे खरे दुःख नक्की काय आहे? – त्यांचे खायचे आणि दाखवायचे दात वेगळे तर नाहीत ना? राष्ट्रवादाची वाढती ताकद पाहून या लोकांनी आपले मार्ग व मोर्चे बदललेले तर नाहीत ना? हसनेन यांच्या पुस्तकाच्या वाचनानंतर मनात येणारी–अस्वस्थ करणारी–शंका अखेर ही आहे.

कारण जमाते इस्लामच्या प्रचाराचे हसनेन यांना दु:ख होते. ते दु:ख हसनन प्रकट करतात. पण हसनेन यांना हे दु:ख का होते? हसनेन म्हणतात...' जमाते–इस्लामीला, सर्व मुस्लिम जमाते इस्लामीचे अनुयायी बनवावयाचे आहेत–म्हणजेच सर्व हिंदूंना हिंदुमहासभेचे अनुयायी बनवायचे आहे. हे झाले तर निकालच लागला ' [पृ. ५३] '...या प्रयत्नांच्याकडे बोट दाखवून हिंदू जातीयवादी भारतीय मुस्लिमांविरुद्ध प्रचार करू लागतील. ' [पृ. १५२]

म्हणजे, हसनेन ज्यांना ' जातीयवादी ' म्हणून शिवी हासडतात ते हिंदू या भारतात नसते तर असा प्रचार करावयास हरकत नव्हती.


मला हसनेन यांच्यावर कोणतेच विचार लादावयाचे नाहीत. पण हसनेन यांच्या विचारांत अधिक स्पष्टता हवी होती. प्रि. शहांच्या प्रस्तावनेला उत्तर देताना जे हसनेन, मी कुराण शेवटचे मानतो आणि पुन्हा महंमद होणार नाही असे मानतो म्हणून सांगतात, त्यांच्याबाबत तर हे अगत्याचे होते.

माझे विचार हसनेन आणि त्यांच्या चाहत्यांना हास्यास्पद वाटतील.–पण, ताक फुंकून पिणे हास्यास्पद असले तरी ते अनेकदा आवश्यक असते.

आणि एक गोष्ट तर नक्कीच. काही झाले तरी हसनेन माझ्यावर रागावणार नाहीत. कारण त्यांना शेख सअदीचे एक वाक्य नक्कीच माहीत असेल ' नेक बाशी व बदत गोयद खल्क, बह के बद बाशी व नेकद गोयन्द [तू चांगला असूनदेखील लोक तुला वाईट म्हणत असतील, तर ते तू वाईट असून लोकांनी चांगला म्हटल्यापेक्षा बरे].

**—दत्तप्रसाद दाभोळकर**

**[भारतीय मुस्लिम : आव्हान आणि आवाहन. लेखक : एस. इ. हसनेन. प्रकाशक : आंतर भारती, मूल्य : तीन रुपये. पृ. १५२]**



उच्चपदस्थ राज्यकर्त्यांच्या वैचारिक आणि सार्वजनिक चारित्र्याबद्दल राज्यकर्त्यांतीलच प्रामाणिक कार्यकर्ते आता जाहीरपणे टीका करू लागलेले आहेत.
आपण चाललो आहोत कुठे ?
या लेखात सांगितलेल्या इतिहासाची पुनरावृत्ती तर सुरू नाही !

# गाथा पराभवाची....!

राष्ट्र गलितधैर्य झाले म्हणजे पराक्रमाचा इतिहास गावा, पुरुषार्थाचे माहात्म्य वर्णन करावे आणि हतवीर्य समाजाला प्रेरणा द्यावी, हा इतिहासाचा फार महत्त्वाचा उपयोग आहे. महाभारताच्या प्रेरणादायी कथा शिवरायाला स्फुरणदायी ठरल्या हा इतिहासही नजरेआड करता येणार नाही. 'पूर्वदिव्य ज्यांचे त्यांना रम्य भाविकाळ' या आशावादाची आज आपल्या राष्ट्राला आवश्यकता आहे. राष्ट्राच्या पतनसमयी इतिहासातील विजिगीषु कथांपासून स्फूर्ती घेऊन मातीतून मोती निर्माण झाल्याचे पुरावे उपलब्ध आहेत. असे असताना पराभवाची रडकथा सांगण्यासाठी मी का प्रवृत्त झालो ? स्फूर्तिकथांवर माझा विश्वास नाही किंवा क्रांतीची गीते मला जमणार नाहीत व आवडणार नाहीत असे नाही. परंतु इतिहासाची पुनरावृत्ती होत असते या नियमाप्रमाणे जर आमच्या चुकांचा इतिहास पुन्हा निर्माण होऊ लागला तर त्याला कुठे तरी बांध घालणे अगत्याचे नाही का ? पुढच्यास लागलेल्या

**प्रा. गोविंद देशपांडे**

ठेचेमुळेही मागचा शहाणा होत नसेल तर त्याला त्याची जाणीव देणे आवश्यक आहे ना ? मग, हा धोक्याचा कंदील दाखविण्याची वेळ आज आली आहे असे मला वाटते.

## पराभवाचा निर्देश अटळ

आपण मान्य करा किंवा करू नका परंतु इतिहास तुमच्या पराभवाचा निर्देश केल्याशिवाय पुढे जाणार नाही. सत्य हे कटू असते म्हणून त्याकडे डोळेझाक करणे शहाणपणाचे ठरणार नाही. डोळेझाक केल्यामुळे आजवर कुठल्या समस्या सुटल्या आहेत ? स्वत:चे डोळे झाकून दूध पिणाऱ्या मांजराच्या पाठीत बडगा बसल्याशिवाय कसा राहील ? आपल्या चुकांचा परिणाम आपल्याला भोगावाच लागणार आहे. तुमच्या व्यथांशी आम्हांला काय करायचे आहे ? आम्हांला शौर्याच्या कथा हव्या आहेत. असे म्हणताना आपण आत्मप्रतारणा करीत असतो. माणूस जेव्हा जेव्हा आत्मप्रतारणा करतो आणि उलट त्याचे समर्थन करू लागतो तेव्हा त्याचा कडेलोट अपरिहार्य बनतो. आज इतिहाससंशोधकदेखील सत्य इतिहास दडपून ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. काही चुकीच्या तत्त्वांच्या आणि हीन आदर्शांच्या मागे लागून विकृत इतिहास समोर ठेवणाऱ्या इतिहाससंशोधकांची गय करण्यात अर्थ नाही. कदाचित याचे तात्कालिक परिणाम सुखद वाटतील परंतु अंतिम परिणाम अनिष्टच असतील. उद्याचे कोणी पाहिले आहे या चार्वाक्‌वृत्तीने जगाचे कल्याण होणार नाही. एखाद्या थोर आणि लोकप्रिय पुरुषाने केलेल्या वाईट कृत्याचा (किंवा उलटही) पुरावा उपलब्ध झाला तर तो कसा नाहीसा करता येईल याचाच विचार आमच्या इतिहाससंशोधकांसमोर असतो. हे प्रामाणिक इतिहासाला तडे देणारे आहे अशी व्यथा महाराष्ट्रातील एका नामवंत इतिहाससंशोधकाने जाहीर सभेत व्यक्त केली होती. ही प्रवृत्ती हितावह आहे असे म्हणण्याचे धाष्टर्य कसे करता येईल ? पराभवाची गाथा आम्हांला नको असे म्हणणाऱ्यांना प्रामुख्याने आपल्या चुका लपवाव्या वाटत असतात. ह्यात पुरुषार्थ नाही याचा विसर पडू नये. आपल्या अध:पतनाचा इतिहास डोळसवृत्तीने पाहण्याच्या प्रयत्नांत अनेकांची अंत:करणे व्यथित होण्याची शक्यता आहे. परंतु तसे न करण्यामुळे अनिष्ट मार्गाने पुन्हा वाटचाल सुरू होण्याची भीती आहे म्हणूनच आपल्या रोषाचा धनी होऊनही प्रामाणिक इतिहासाचा मागोवा घेण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करीत आहे. माझा माणसांपेक्षाही इतिहासावर जास्त विश्वास आहे. कारण तो अत्यंत प्रामाणिक आहे. कुणाचीही पर्वा न करता कटू सत्यदेखील निर्भीडपणे सांगितल्याशिवाय तो राहणार नाही.

दुसऱ्या बाजीरावाची कारकीर्द हा मराठेशाहीला लागलेला कलंक आहे. राज्यकारभारापेक्षाही राज्यकर्त्यांचे लक्ष दुसऱ्याच गोष्टींकडे लागले होते. परिणामत: पराक्रमी मराठ्यांनाही पराभव पत्करावा लागला होता. खर्ड्याच्या लढाईत पेशव्यांचे यश कळसाला पोचले होते पण तेवढ्यातच राज्यशासनकुशल सवाई माधव-

रावांच्या मृत्युमुळे मराठ्यांना हादरा बसला. महादजी शिंद्यांच्या पराक्रमाचे पर्वही त्यांच्या मृत्युमूळे संपुष्टात आले होते. तानाजीच्या मृत्युनंतर रणांगणाहून पलायन करणाऱ्या मराठी शिपायाला "तो दोर मी केव्हाच कापून टाकला आहे. कडेलोट होऊन भ्याडाचे मरण पत्करण्यापेक्षा युद्धात मरण आले तर तुमचे नाव तरी होईल," असे सांगणारा सूर्याजी भेटताच विजयश्रीने माळ घातली होती. परंतु या काळात ह्या खचलेल्या मनोवृत्ती सावरून धरणारा नेता पुढे आला नाही मराठ्यांची वैभवाकडे वाटचाल सुरू असतानाच नियतीचे विकट हास्य चालू होते. नियती आम्हांला आव्हान देत होती. पण ते आव्हान स्वीकारणारा सूर्याजी मात्र आमच्यांत नव्हता. नाहीतर दुसरा सिंहगड निर्माण व्हायला वेळ लागला नसता. पाकिस्तानशी चालू असलेल्या युद्धातील विजयाचे यशोगान चालू असताना नियतीचे विकट हास्यच चालू नव्हते काय ? आमच्या युगातील अखेरच्या महापुरुषाचे ताश्कंदहून परस्परच प्रयाण झाले असताना आमच्यात सूर्याजी निर्माण झाला नाही ही आपली खरी शोकांतिका आहे. त्या नेत्याची कणखरवृत्ती आपल्याला स्वीकारता आली नाही. राष्ट्रीय जीवनात 'शिव' निर्माण करण्याचे सामर्थ्य असलेल्या सदाशिवानेही याच वेळी आपल्याला सोडून जावे याचा अर्थ काय ? नियतीने निर्माण केलेल्या ह्या दैवदुर्विलासाला काय सुचवायचे आहे, कुणास ठाऊक !

सन १६४८ ते १७६१ पर्यंत इंग्रजांचे आणि मराठ्यांचे संबंध चांगले होते. व्यापाराच्या निमित्ताने आलेले इंग्रज या काळात मराठी राज्यकर्त्यांना नजराणे देत असत. मराठ्यांच्या तरवारीचे तेज त्यांना माहीत होते. महाराष्ट्राचा एक गव्हर्नर माल्कम याने तर मराठ्यांच्या लढाऊ वृत्तीचा आवर्जून उल्लेख केला होता...महाराष्ट्रात राज्य करायचे असेल तर मराठ्यांची युद्धप्रवृत्ती नाहीशी केली पाहिजे हे त्याने ओळखले होते. मराठ्यांची युद्धप्रवृत्ती काही अंशी दबली असली तरी पूर्णत: नाहीशी झाली नाही ही गोष्ट त्याच्या ध्यानात होती. इतिहासाकडे दुर्लक्ष करण्याची चूक इंग्रजांनी केली नाही हेच त्यांच्या यशाचे गमक होय. मराठ्यांच्या पराक्रमाचा थोडा का होईना त्यांना जवळून परिचय झाला होता. त्यामुळे पेशव्यांच्या राजकारणात हस्तक्षेप करायला किती वेळ लागणार याचाही आराखडा त्यांच्यासमोर होता. पण इतिहासकार म्हणतात त्याप्रमाणे राघोबादादांच्या कलहामुळे किंवा साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकर म्हणतात त्याप्रमाणे राघोबांच्या पूर्वीच आंग्र्यांच्या विरोधात लढण्यासाठी नानासाहेब पेशव्यांनी घेतलेल्या मदतीमुळे, पण इंग्रजांना अपेक्षेपूर्वीच पेशव्यांच्या राजकारणात हस्तक्षेप करता आला. आपसांतील दुही हा मराठी राज्याला लागलेला शाप आहे. राजसत्तेसाठी आम्ही जेव्हा जेव्हा आपसात भांडलो तेव्हा तेव्हा दुसऱ्याचाच फायदा झाला, हा इतिहास नजरेआड करून चालणार नाही. अलिबागचा तुळाजी आंग्रे हा ताराबाईच्या पक्षाचा असला तरी तो पेशव्यांना इंग्रजांपेक्षा जवळचा नव्हता का ? पण...... !

ही अनंत कालापासूनची आमची वृत्ती आहे. आपसातील दुहीमुळे इंग्रजांची कोणी केव्हा मदत घेतली हे पाहण्यापेक्षा कोणी मदत घेतली नाही हे पाहणे व सोपे जाईल असे मला वाटते. थोरल्या माधवरावाने व बाजीरावाने आंग्र्यांच्या विरोधात, रघुनाथरावांनी नाना फडणिसांच्या विरोधात, नाना फडणिसांनी होळकरांच्या विरोधात तर नागपूरकर भोसल्यांनी पेशव्यांच्या विरोधात इंग्रजांची मदत घेतली नव्हती का? निजामांचा प्रतिनिधी मुशिरूल्कमुल्क हा अनेक दिवस नानांचा वैरी होता, परंतु पेशव्यांच्या विरोधात लढण्यासाठी नानांनीच त्याचे साह्य घेतले नव्हते का? स्वार्थान्धतेने वैऱ्याशी संधान बांधणारे असे 'शहाणे' आजच्याही समाजात नाहीत का? असे असतानाही पराभवाचा इतिहास पाहू नये असे वाटत असेल तर तो भ्याडपणाच नव्हे काय?

**मराठ्यांमध्ये वैयक्तिक पराक्रम होता, परंतु राष्ट्रासाठी एक होण्याची इच्छा अभावानेच आढळत असे.** ती इच्छा जेव्हा निर्माण झाली नाही तेव्हा पराभव पत्करावा लागला आहे. राघोबाच्या पराभवाच्या वेळी पेशवे, होळकर आणि शिंदे एकजुटीने झुंजले. त्या वेळी राघोबांना पाठीशी घालणाऱ्या इंग्रजांनाही निमूटपणे पराजय स्वीकारावा लागला आणि परिणामतः राघोबांना फडणिसांच्या स्वाधीन करावे लागले. हेच जर नेहमी घडले असते तर इतिहासकारांना फक्त 'विजयपर्व' असलेलाच मराठ्यांचा इतिहास रंगवावा लागला असता, पण ..!

राजा हा स्वामी आहे अधिपती आहे हे आमच्या पूर्णतः ध्यानात आहे. आमचे स्वामी उपभोगाची एकही संधी गमावीत नाहीत. वयाच्या सोळाव्या वर्षी राजसत्तेवर येणारा आणि सत्ताविसाव्या वर्षी राजयक्ष्म्याच्या रोगाने कालवश होणारा स्वामी विरळाच! "रमे, राज्यकर्ता या नात्याने मी यशस्वी झालो असेन पण वैयक्तिक जीवनात तुला सुख देऊ शकलो नाही," असे त्याचे (रणजित देसायांच्या स्वामीचे) आर्त उद्‌गार हृदयाला घरे पाडल्याशिवाय राहत नाहीत. पंतप्रधान बनूनही स्वतःच्या मालकीचे घर किंवा इस्टेट नसणारी निःस्वार्थी माणसे किती सापडतील? पेशवाईच्या अखेरचा राजपुरुष आपल्या सर्वांच्या परिचयाचा आहेच. जनता दारिद्र्यात पिसून निघत असताना स्वतःच्या रंगेलपणाशिवाय कसलाही विचार न शिवणारा अजोड राज्यकर्ता आहे हा! जनतेत अस्थैर्य आणि अशांती पसरली असतानाही स्वतःच्या विलासाला पैसा कमी पडतो म्हणून आधीच कफल्लक बनलेल्या जनतेवरही 'संतोषपट्टी' नावाचा अन्याय्य कर बसविणारा राजा दुसरा कुठे असू शकेल? ही संतोषपट्टी का?—म्हणे बाजीरावाचे राज्य असल्याबद्दल जनतेने संतोष व्यक्त करावा म्हणून!—अनुशासनहीनतेला कंटाळलेल्या पेशव्यांचे राज्य बुडावे म्हणून शनिवारवाड्यावर अनुष्ठाने मांडणाऱ्या जनतेला आनंद होतो म्हणून!! असे विलासी राजे—नालायक राज्यकर्ते—निर्माण होऊ लागले तर जनतेने कोणाकडे पाहावे! राजा म्हणजे जगाचा उपभोगशून्य स्वामी

असावा हे सांगायला एखादा लालबहाद्दुरच जन्मावा लागतो. 'राज्य उपभोग म्हणजे राजसन्यास !' हे तत्त्व सांगणारे (राम गणेश गडकरी यांचे) 'राज-संन्यास' म्हणूनच वंदनीय वाटते. भुकेने व्याकुळ झालेल्या जनतेला लाथाडून रंगेलपणात वेळ घालविणारा – राज्याची मसलत ज्या ठिकाणी चालावी ही अपेक्षा — त्या शनिवारवाड्यावर लावण्यांचे फड चालविणारा हा कसला आला आहे उपभोगशून्य स्वामी ?

आणि ह्याच संधीचा फायदा घेणारा अमात्य ! आपल्या भावनांपेक्षाही कटुसत्य सांगणाऱ्या इतिहासाची मी अधिक पर्वा करतो. मला माफ करा. परंतु मनमोकळे-पणान सत्य सांगू द्या. राज्यकर्त्यांवरील विश्वास कमी होऊ लागल्यामुळे अगोदर दिलेल्या कर्जाची दुसऱ्या बाजीरावाच्या काळात मागणी होऊ लागली. आर्थिक घसरगुंडीला सुरुवात झाली होती. सीमांवर लढणाऱ्या सैनिकांना सारे राज्य आपल्या पाठीशी आहे ही जाणीव असावी लागते. अन्यथा ते निःशंक मनाने लढू शकत नाहीत. आपल्या माघारी आपल्या घरादारांची आपल्यापेक्षाही जास्त काळजी घेतली जाईल असा विश्वास निर्माण झाला तरच. ते प्राणपणाने लढू शकतील. परंतु त्या वेळी आमच्या रंगेलपणामुळे, आमच्या हौशींच्या पूर्तीसाठी पैसा लागत असल्यामुळे, सैनिकांना पगार द्यायला आमच्याजवळ पैसा नव्हता. पुरुषार्थ गाजवून, पराक्रमाचे दर्शन घडवून राष्ट्रतेज दाखविण्याऐवजी आमच्या तरवारी गंजून पडल्या होत्या आणि त्याच वेळी नाना फडणीस सावकार बनला होता. नानांच्या मृत्यूनंतर त्यांच्याकडे ९ कोटी रुपये सापडले. कुठून आले हे पैसे ! राजाला आणि राज्याला फसवूनच जमविले होते ना हे पैसे ! असले आदर्श राजकारणाच्या उच्च-स्थानी असल्यावर पराभव होऊ नये तर काय ? असल्या उच्चपदस्थ माणसांच्या लफड्यांचा शोध लावण्याचा आणि त्याला शासन करण्याचा विचारही मनात येऊ नये हे राज्याच्या ऊर्जितावस्थेचे चिन्ह कसे असेल ? नाना फडणीस व्यक्तिगत जीवनात पावित्र्यासाठी, मांगल्यासाठी, शुचितेसाठी कधीच प्रसिद्ध नव्हते हे कठोर सत्य आजतरी जगाला आवर्जून सांगू द्या. नानांनी आपले रक्षक म्हणून परक्या अरबांची नियुक्ती केली होती. त्यांनी शरीररक्षक म्हणून मराठ्यांची नेमणूक केली नव्हती. ते पराक्रमी नव्हते म्हणून नव्हे तर ते फक्त 'आपलेच' होते म्हणून ! आपल्या अनेक भानगडी झाकण्यासाठी असे करावे लागते. पण याचे समर्थन आपण कुठवर करणार ? मराठ्यांची अवनती थांबविण्याचे सामर्थ्य या विचारवंतांमध्ये होते, परंतु स्वार्थापुढे राष्ट्राचा विचार करायला त्याला सवड नव्हती एवढेच !

पुष्कळदा जनतेवरील आणि कार्यकर्त्यांवरील अविश्वास राष्ट्राच्या अधःपाताला कारणीभूत झालेला आहे. औरंगजेबाने स्वतःच्या मुलावरही विश्वास ठेवला नव्हता. प्रमुखांवरील श्रद्धा तर दूरच. त्याचे परिणाम त्याला भोगावेच लागले. दक्षिणेत गेलेल्या मोगल सेनाधिकाऱ्यांनी अनकदा सैन्याची आणि पैशाची मदत

मागवूनही त्यांच्यावर विश्वास नसल्यामुळे त्याने साह्य केले नाही हे प्रामाणिक इतिहास सांगत आहे. शिवरायांनी आपल्या एकनिष्ठ सैनिकांवर आणि सेनाप्रमुखांवर नितान्त विश्वास ठेवला, हीच गोष्ट त्यांच्या विजयाला कारणीभूत झाली आहे. परस्परांवरील विश्वास हेच विजयाचे गमक असते. नुकत्याच झालेल्या चीनच्या आणि पाकिस्तानच्या आक्रमणानंतर वाटेल ती झीज सहन करून ' वयं पंचाधिकशतम् 'ची जाणीव देणाऱ्या आणि संरक्षणनिधीला अलोट संपत्ती देणाऱ्या जनतेला आपण विश्वासात घेतले काय ? त्यांच्या त्यागाचा आपण काय मोबदला दिला ? राज्यकर्त्यांना सैनिकांच्या आणि जनतेच्या त्यागाची किंमत करता आली पाहिजे. हे औरंगजेबाला साधले नाही म्हणून त्याला निमूटपणे पराभूत व्हावे लागले, याचे विस्मरण होता कामा नये. असंतुष्ट जनतेवर शास्ता फार काळ आपली सत्ता चालवू शकत नाही. अकार्यक्षम, सर्वांची श्रद्धास्थाने बनू न शकणारे शास्ते कालौघात नाहीसे होणार आहेत. कुणाचा मुलगा किंवा मुलगी हे राज्यकर्ता होण्याचे प्रमाणपत्र ठरू शकत नाहीत. नेतृत्व कणखर असेल तरच जनतेत श्रद्धाभाव निर्माण होऊ शकतो, अन्यथा एखादे मंत्रिमंडळ गडगडले की केंद्रीय नेतृत्वावरील श्रद्धा कमी होऊ लागते.

## अदूरदर्शीपणा

राष्ट्र टिकविण्यासाठी, सुरळीत चालविण्यासाठी योग्य असणारी माणसे जेव्हा राजकारणातून घालविली जातात, तेव्हा राष्ट्राचा अधःपात होतो हे ऐतिहासिक सत्य आहे. राजकारणात राहून पावित्र्य ओतता येत नाही हे पाहून राष्ट्रपतिपदावरून निवृत्त होऊन सदाकत आश्रमात राहण्याची भाषा बोलणारे किंवा संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावरून का होईना, परंतु सत्तेवरून दूर होणारी माणसे पाहिली की राष्ट्राचा विचार करणे अगत्याचे बनते. योग्य कार्यक्षम माणसे अधिकाराच्या जागांवरून दूर सारताना पाहिले, की राष्ट्राच्या अधःपतनाचा काळ जवळ आला की काय असे सुज्ञ माणसास वाटू लागते. योग्य व्यक्ती राष्ट्रात नव्हत्या म्हणून नव्हे तर राज्यकर्त्यांना त्यांचे साह्य नको होते म्हणून अनेक योग्य व्यक्तींना दूर सारण्यात दुसऱ्या बाजीरावाने अदूरदर्शीपणा दाखविला याबद्दल मतभेद असण्याचे कारण नाही.

पराक्रमच नको होता तेथे शस्त्रास्त्रांचे काय ! तोफा ओतण्याचे नऊ कारखाने शिवाजीमहाराजांनी काढले होते असे इतिहास सांगत आहे. पण हे करायला दुसऱ्या बाजीरावाला सवड कुठे होती ? त्याचे ' सांस्कृतिक कार्यक्रम ' चालू होते ना ?

याच कारकीर्दीतील एक गोष्ट ध्यानात घ्यायला हवी. मराठी सैन्याचा चीफ कमांडर म्हणून मेजर जॉन फोर्टची नियुक्ती करण्याची घोडचूक दुसऱ्या बाजीरावाने केली होती. या माणसाला २५०० रुपये मासिक वेतन देण्यात येत होते. पेशव्यांच्या

इच्छाप्रमाणे मी सदैव वागेन असे आश्वासन देणाऱ्या ह्या कमांडरने १९१७–१८ च्या लढाईत इंग्रजांशी लढण्याचे साफ नाकारले. आपल्याच माणसांच्या विरोधात लढण्यात कृतार्थता मानणारा भारतीय नव्हता ना तो !

अशा राजवटीचा अस्त होऊ नये तर काय ? पेशवाईचे हे रक्तरंजित पर्व संपल्याचे समाधान जनतेने का मानू नये ? योग्य नेतृत्वाचा अभाव, आपसांतील वैमनस्य, फुटीर वृत्ती, मानबिंदूबद्दल उदासीनता, परस्परांबद्दलची अश्रद्धा, राज्यकर्त्यांमधील उपभोगलालसा, स्वार्थांधता, अदूरदर्शीपणा, स्वसंरक्षणाबद्दलची निराशाजनक वृत्ती ह्या अनंत कारणांमुळे आपण पराभूत झालो. ही पराभूततेची मीमांसा करताना आपण का मागे असावे ? हे पुन्हा घडू नये असे वाटत असेल तर डोळसपणे पराभवाची गाथा गाण्यासाठी आपण पुढे सरसावले पाहिजे.

O




बृहन्मुंबईकरिता वितरक

**मे. बी. जयंतीलाल अ‍ॅण्ड को.,** १५ मंगलदास रोड, मुंबई २

बृहन्मुंबईखेरीज महाराष्ट्रासाठी वितरक

**मे. एस्. एम्. प्रभू अ‍ॅण्ड सन्स,** १५ हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७



# पुरंदरच्या बुरुजावरून

साप ! साप !

या नावाचं सातारा प्राती एक गांव आहे. या गावाचा दरारा नावासारखाच होता. 'साप' म्हटलं की पंचहत्यारी मोगलाच्या अंगावरहि काटा उभा रहायचा बघा. दचकून दोन पावलं मागं हटायचा. गावात अव्वल तटाबुरुजांचा एक भला मोठा वाडा होता. वारुळासारखा. वाड्याच्या भवती सात हजार घोड्यांची पागा होती. दसऱ्याचं शिलंगण निघालं की सात हजार घोडा टापा आपटत निघायचा. सात हजार भाले अन् समशेरी तळपायच्या. वाड्याचा दरवाजा करकरा वाजत खुलायचा. नगारे नौबती दणाणायच्या. शिंगांच्या लकेरी थरारून उठायच्या. सात हजार माना मुजऱ्यासाठी झुकायच्या. अवघ्यांच्या नजरा दरवाजावर लागायच्या. गावातल्या आयाबाया डोईवरचा पदर पुढं ओढीत दाराआड व्हायच्या अन् फटीतून डोळे विस्फारीत बघायच्या. वाड्याच्या दरवाजात घोड्यांच्या टापा वाजायच्या. हलग्या अन् ताशे चढ्या पट्टीत कडाडायचे. खंडोबाचा येळकोट आभाळाला भिडायचा अन् पिवळ्या धमक उधळत्या भंडाऱ्यातून एक धिप्पाड घोडेस्वार दरवाजात यायचा. झुपकेदार मिशा. टप्पोरे डोळे. मऱ्हाटी पगडी.

— — — — —

**ब. मो. पुरंदरे**

— — — — —

# इंद्रोजी कदम

परातीसारखी छाती अन् सारा रगेलपणा. सातारी. कोण, कोण हा मर्दाना राव ! काय याचं नाव ?

याच नाव इंद्रोजीराव कदम.

छत्रपती संभाजीमहाराज संगमेश्वरी पकडले गेले. औरंगजेबाला फार फार आनंद झाला. प्रत्यक्ष स्वतःच्या बापाला त्याने पूर्वी कैद केलं, तेव्हासुद्धा त्याला एवढा आनंद झाला नव्हता. त्याने शंभूछत्रपतींना तुळापूरी छळून छळून ठार मारलं. यमपुरीतले यमदुतहि लाजले. राजा ताठ छातीने मेला. हुंकारला नाही की सुस्कारला नाही. राजाच्या मरणाची रात्र फाल्गुनी अवसेची होती. औरंगजेबाला वाटलं की, मराठी दौलत बुडाली. त्याचा पिसाट आनंद आस्मानात मावेनासा झाला.

पण राजाच्या मरणाच्या दुसऱ्याच दिवशी गुढी पाडवा होता. आवस संपली होती. नवं वर्ष उगवलं होतं. मराठमुलखातल्या गावा-गावाच्या वेशीतून मराठी मनगटे भाले झेलीत आणि घोडे फेकीत बाहेर पडत होती. साऱ्यांची झडप होती मोंगली फौजेवरच ! खंडेराव दाभाडे, नेमाजी शिंदे, धनाजी जाधवराव, संताजी घोरपडे, शंकराजी नारायण, रूपाजी भोसले, परशराम त्र्यंबक, विठोजी चव्हाण, नावजी बलकवडे, सिदोजी गुजर–एक की दोन ? अहो असे हजारो चित्ते चवताळून उठले होते. त्यातच होता एक बहाद्दर इंद्रोजी कदम !

इंद्रोजीची समशेर मोठी उर्मट होती. इंद्रोजी आला म्हटलं की,

मोंगलं उंदरासारखी पळायची. भलता दरारा ! इंद्रोजीची फौज यायची ती तडातडा तडा एकदम. वळवाच्या वादळात गाराचा पाऊस सडासडा सडा यावा तशी. मारून लुटून कापून गनिमाचा पार फडशा !

इंद्रोजीने मोंगलांची सतत धूळधाण मांडली होती. मोंगलांच्या छावण्या म्हणजे इंद्रोजीचं राखीव शिकारी रान. त्याने छापा घातला की, हजारो अन् लाखो रुपयाचं युद्धसाहित्य आणि खजिना गमावून मोंगलांना उघडं नागडं पळायची वेळ यायची. इंद्रोजीनं मराठी खजिन्यात अशी भर लाखांनी घातली होती. त्याचा स्वतःचा वाडाहि सोन्यारुप्याने तुडुंब होता.

औरंगजेब नर्मदा ओलांडून महाराष्ट्रात उतरला होता मोंगली साम्राज्याचा जाहीरनामा फडकवायला. पण झालं उलटंच ! मराठ्यांनीच नर्मदा ओलांडली. मराठी घोडे सिरोंजवर जाऊन धडकले. त्यांनीच मोंगली हद्दीत मराठी साम्राज्याचा जाहीरनामा फडकवला. नवं शिलंगण सुरू झालं. मोंगलांची फजिती करणं हाच खेळ होता, हाच विनोद होता. हाच व्यायाम होता. हाच देवधर्म होता. मिळकत रग्गड होत होती. धंदा जोरात चालला होता.

एकदा अशीच इंद्रोजी कदमाची छावणी पडली होती खानदेशात. सांजची वेळ होती. झाडाखाली गाशा टाकून इंद्रोजी बसला होता. लष्करात गप्पाटप्पा, थट्टाविनोद चालू होते. इंद्रोजी बघत होता दिल्लीच्या रोखाने शून्यात. त्याच्या डोक्यातल्या फौजा दौडत होत्या. धूळ उसळत होती. हर हर महादेव घुमत होता. त्याच्या डोक्यांत एक कल्पना आली. तो आपल्या छावणीच्या कारभाऱ्याकडे वळत म्हणाला,

"कारभारी पंत !"

"आज्ञा सरकार !"

"पंत, उद्या आपल्या लष्करातल्या घोड्यांना चांदीचे नाल ठोका !"

"चांदीचे नाल ?"

"निखळ चांदीचे !"

" इंद्रोजी मोठ्याने हसत हसत बोलत होता. सारा सूर थट्टेचा होता. कारभारीहि त्याच जातीचा. पण गांभिर्याचं वेड पांघरून तो म्हणाला,

"पण सरकार, निखळ चांदीचे नाल भारी ठिसूळ होतील. घोडी दौडायला लागली की नाल निखळून पडतील !"

" पडू द्या, पडू द्या ! पडायासाठी ठोकायचे. नर्मदेच्या पार बादशाही मुलखांत आमच्या मराठी घोडयाचे नाल निखळून पडूं द्या ! मोंगलाला कळू द्या की, मराठी औलाद आता भिकारी राह्यली नाही; भित्री तर नाहीच नाही; चांदीचे नाल उधळीत उधळीत मराठी फौजा निघाल्या दिल्लीवर ! असेल हिम्मत तर या आडवे ! " आणि ह्या अपरूक कल्पनेवर मराठी लष्कर खळखळून हसलं. मिशी चढवीत हसलं.

औरंगजेब मरायच्या आतच मराठी फौजा दिल्लीची वाट दौडत होत्या. आजपर्यंत दिल्ली दख्खनवर चालून येत होती. आता दख्खन दिल्लीवर चालून जात होती.

अखेर पराभवाचे कोळसे पदरी घेऊन औरंगजेब महाराष्ट्रातच मेला. अडीचशे कोस लांबीची अन् साठ कोस रुंदीची हिंदवी स्वराज्याची भूमि त्याला हवी होती. नाही मिळाली ! मिळाली फक्त तीन हात रुंदीची अन् सहा हात लांबीची जमीन !

औरंगजेबाच्या मरणानंतर मराठ्यांचे युवराज शाहुराजे मोंगलांच्या कैदेतून सुटले. शाहूराजांची ऐन उमेदीची अठरा वर्षं कैदेत गेली होती. त्यांनी सुटून आल्यावर साताऱ्यासच तख्ताची जागा ठेवली. ते छत्रपति झाले.

आता औरंगजेबाशी चाललेली पंचवीस वर्षांची लढाई संपलेली होती. भांडाभांडी संपलेली होती. आता मांडामांडी करावयाची होती. पण मोंगलांवर मन मानेतो सुसाट स्वाऱ्या करणाऱ्या मराठी स्वारांना अन् सरदारांना शिस्तीच्या आणि अनुशासनाच्या ओळंब्यात आणून उभं करणं हें एक मोठं अवघडच काम होतं. ज्याला त्याला वाटत होतं, 'मीच मोठा ! मीच शेर ! ' त्यांत पुन्हा दुही. लढून अंगात मस्ती आलेली होती. त्यांतच अहंकार मिसळला.

इंद्रोजी कदमाचं तेच झालं. पदरी फौज होती. घरी अमाप धनदौलत होती. अंगी पराक्रम होता. कुठं झुकावाकायची सवय राहिली नव्हती. शाहूराजे गादीवर बसले, छत्रपति झाले तरी इंद्रोजी कदम काही राजांच्या मुजऱ्याला गेला नाही. शाहूराजांना हे जाणवत होतं. शाहूमहाराजांनी खंडोबल्लाळ चिटणिसांना मुद्दाम इंद्रोजीकडे पाठवले. खंडोबल्लाळ सापला आले. वाड्यात गेले. इंद्रोजीला भेटले. इंद्रोजी जरा



इंद्रोजी दरबारात प्रवेशला अन् थबकलाच.

कुर्ऱ्यातच होता. खंडोबल्लाळ म्हणाले,

"इंद्रोजीराव, साताऱ्याला महाराज छत्रपति गादीवर आले."

"होय ! ऐकलं खरं !"

"मग आता ही राजाची दौलत तुमच्यासारख्यांच्या भरवशावरच उभी राह्यची. तर एकदा महाराजांच्या मुजऱ्याला–"


"मुजऱ्याला ?"

'अ–हा–भेटायला ! पण एकदा यायला हवंच तुम्ही."

बराच वेळ इंद्रोजी काहीच बोलला नाही. त्याला माहीत होती शाहू-महाराजांची स्थिति. नुकते सुटून आलेले. धड नाही पैसा. धड नाही फौज. नुसतेच नावाचे महाराज ! त्यापेक्षा माझा थाट, धनदौलत, फौज, पराक्रम दरारा सारं कांही उदंड आहे. अन् मी झुकून वाकून त्या बैराग्यापुढं जाऊ ?

इंद्रोजीला गर्वाचा फुंद चढला. पण जराशाने तो चिटणिसांना म्हणाला,

"बरं तर चिटणीस आम्ही येऊ साताऱ्याला. महाराजांना भेटू. पण आमचे मानपान बरोबर घेऊन येऊ. नगारे चौघडे वाजवीत येऊ. दिवसा मशालं पेटवून येऊ. महाराजाच्या वाड्यात घोड्यावर बसून दरवाजा-



स्वत: महाराज आणि अष्टप्रधान अगदी साध ! आणि नटलं होतं फक्त एक कुत्रं

तून शिरू ! घोड्यावरून उतरणार नाही. नगारे बंद करणार नाही. नजराणे देणार नाही. ”

हे म्हणजे भलतंच अवघड काम झालं ! वास्तविक भेटायला जाताना सारे मानपान दूर ठेवून नम्रपणे मुजरे करीत राजापुढे जायचं अन् नजराणा द्यायचा. हात जोडून अदबीने उभं राह्यचं असत. पण हा इंद्रोजी म्हणतो- ! चिटणीस अवघडांत पडले. ते ‘ होय ’ ‘ नको ’ न म्हणता परत साताऱ्यास आले. त्यांनी इंद्रोजीचं वागणं आणि बोलणं महाराजांना एकांती सांगितलं. शाहूमहाराजांनी ऐकून घेतलं अन् म्हणाले,

“ चिटणीस जा परत. इंद्रोजी कदमांना सांगा. म्हणावं, ‘ तुम्हाला जसं यायचं असेल तसे या. आम्हाला आनंदच आहे ! ’ जा, सांगा त्यांना. ”

चिटणीस सापला गेले. बोलले. इंद्रोजी कदम घातल्या अटींनिशी यायला तयार झाला.

अन् चार दिवसांनी सारा आपला वैभवशाली लवाजमा घेऊन इंद्रोजी निघाले. जगाला दिपवायला. महाराजांना खिजवायला. इंद्रोजी साता-

ऱ्यात प्रवेशला. एखाद्या राजाच्या थाटात त्याची स्वारी आली. मानाची वाद्यं दणाणत होती. चौऱ्या अब्दागिऱ्या झळाळत होत्या. स्वतः इंद्रोजीने आपल्या अंगावर नवरत्नांचे व सोन्याचे दागदागिने चिक्कार घातले होते. मारवाड्यांच्या बालाजीसारखा तो अलंकारांनी झाकून गेला होता. हे वैभव मुद्दाम महाराजांना खिजविण्यासाठी !

शाहू महाराजांना वाड्यावर बातमी गेली की, इंद्रोजी कदम अशा थाटामाटात येत आहेत. महाराज शांत होते. ते किंचित् हसले. त्यांनी पंत-पेशव्यांना जवळ बोलावलं अन् त्यांच्या कानांत कांही तरी सांगितलं — दरबारची तयारी करायला !

इंद्रोजीची स्वारी वाजत गाजत वाड्यापर्यंत आली. घोड्यावर बसून तो दरवाजामधून आत गेला. लोक चकीत होऊन पाहत होते. काय ही रंगेली ! अशा मिजाशीत हा चाललाय! हा स्वत:लाच छत्रपति समज-तोय की काय !

इंद्रोजी घोड्यावरून उतरून दरबारच्या पायऱ्या चढून गेला. दर-बारात प्रवेशला अन्—अन् थबकलाच ! जागच्या जागी तो उभा राहिला. सारा दरबार पांढऱ्या पडद्यांनी व गाद्यागिरद्यांनी शुभ्र दिसत होता. जरीची एकहि काडी कुठे चमकत नव्हती. शाहूमहाराज शुभ्र गादीवर लोडाशी बसले होते. भवतीचे अष्टप्रधान पांढऱ्या शुभ्र कप-ड्यात होते. एकहि लहानसासुद्धा अलंकार त्यांच्या अंगावर नव्हता. अन् खुद्द शाहूमहाराजांच्या अंगावरहि एक सुद्धा दागिना नव्हता. फक्त पांढरी शुभ्र शाल होती. अन् तेवढ्यात इंद्रोजीचं लक्ष गेलं महाराजांच्या शेजारी. त्याने चमकून डोळेच विस्फारले. महाराजांच्या शेजारी त्यांचा वाघ्या कुत्रा बसला होता अन् त्या कुत्र्याच्या अंगावर मात्र रत्नांचे व सोन्याचे असंख्य दागिने घातलेले होते ! राजकारणं आणि रणांगणं गाजविलेले प्रधानमंडळ अन् सरदारमंडळ असे ! अगदी साधे ! महा-राजहि असेच ! अन् नटलं होतं फक्त, एक कुत्रं ! इंद्रोजीहून जास्त नटलं होतं !

इंद्रोजी ओशाळला. लाजला. पस्तावला. तो झपाझप पुढं गेला. त्याने जमिनीपर्यंत लवून छत्रपतींना मुजरा केला अन् आपल्या अंगावरचे अलंकार त्याने भराभर काढून महाराजांच्या पायावर ठेवले. O

[ पृष्ठ १५ वरून ]

त्याला (आणि प्रेक्षकांनाही) त्या थोड्या काळातही अमाप सुख देते. तिच्याबरोबर आठ दिवस निवान्त काढायचे म्हणून तो सर्व तयारी करतो आणि वृत्तपत्रांतील एक जाहिरात हे सुखाचं विश्व कोलमडन टाकते. स्वतःच्या सहा महिन्यांच्या मुलाला मारून टाकलेली ती एक वेडसर स्त्री असते. पोलिस येऊन तिला घेऊन जातात. ती पुनः पुन्हा ' I Love you, save me, I am afraid ' म्हणत राहते. दुसरा म्हणजे ' Senventeen ' हा 'Scandinavian' चित्रपट. सतराव्या वर्षी ' जाग ' आलेल्या मुलावर आधारलेला. चित्रपटात तीन-चार वेळा समागमाची दृश्ये [ कमरेवरील भागांवर कॅमेरा ठेवूनच ] होती. त्यामानाने मात्र खूपच सामान्य वाटला. इथे एकाच वेळी दोन चित्रपट पाहायला मिळतात. तसेच चित्रपटगृहातून केव्हा बाहेर पडायचे यावर बंधन नाही. त्यामुळे तोच चित्रपट त्याच पैशात दोन दोन वेळा पाहता येतो. हिंदी चित्रपटही चालू असतात. परवाच एकजण ' साधना ' आणि ' गुनाहोंका देवता ' पाहून आला. सध्या एका चित्रगृहात ' महानगर ' चालू आहे. त्या चित्रपटावर इथे एकजात स्तुतिपर अभिप्राय आले आहेत. आधी येथे India बद्दल काहीच माहिती येत नाही. आली तर एक-दोन ओळींची दोन-तीन दिवसांआड. तेव्हा कॉलमच्या कॉलम अभिप्राय वाचून अभिमान वाटला. TV वर प्रश्नोत्तरांच्या स्पर्धेत ५० विकेट्स् घेणारा भारतीय खेळाडू कोण ? हा चंद्रशेखरचे बाबतीत प्रश्न आला होता, एरवी India हा नावडता विषय. Kenya मधून आलेले लोकही याला अपवाद नाहीत. कालच एक Kenyan भेटला. म्हणाला, ' At the age of two I went to Kenya–Now I am flying to Bombay. It is a very dirty city, is not it ?'

आजच Lords वरील ऑस्ट्रेलियाबरोबरची क्रिकेट मॅच पाहायला काहीजण गेले होते. ब्रिटिश टीमची फिल्डिंग गचाळ तरीही त्यांना टाळ्या. शेवटच्या वीस मिनिटांत ऑस्ट्रेलियनांनी जे क्षेत्ररक्षणाचे कसब दाखवले त्याची सर्व (भारतीय) वाहवा करत होते. पण ब्रिटिश प्रेक्षकाने एकदाही टाळी मारली नाही असे म्हणत होते. मी ही मॅच TV वर पाहिली. मॅच प्रत्यक्ष पाहण्यापेक्षा TV वर पाहणे केव्हाही चांगले. कुणी आऊट झाला की तेवढे दृष्य पुन्हा दाखवतात. कॉमेन्ट्री चालूच असते. बोलिंग टाकणारा बोलर–त्याची संपूर्ण ॲक्शन, बॉल टोलवताना बॅट्स्मन काय करतो, बॉल अडवणारा खेळाडू इत्यादी सर्व गोष्टी अतिशय व्यवस्थितपणे मी प्रथमच पाहिल्या.........आता बाकी सारे पुढील पत्री ––

––यशवंता

[ प्रा. यशवंत कानिटकर यांच्या आपल्या भावास आलेल्या पत्रातील काही भाग. ]

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

जून ८ ते १४ राशि-भविष्य

**मेष :** मंगळासारखा कर्तृत्वसंपन्न ग्रह पराक्रमात येत आहे—आल्यासारखाच आहे. अंतरिक्षातील ग्रहांनी प्रसन्न मनाने दिलेले वरदानच.

११ जूनपासून सारा आसमंत उत्साहाने ओसंडून जात आहे असे दिसू लागेल. माघार घेणे, कोणत्याही कामात कच खाणे हे आता होणे नाही. पुढे सतत जाणे हीच प्रवृत्ती बाणू लागेल. कला—क्रीडा—क्षेत्रांत विक्रम, यश मिळविणे आता फारसे अवघड वाटणार नाही.

यांत्रिक उद्योगधंद्याचे क्षेत्र हाती येईल, नोकरीधंद्यात अनपेक्षितपणे बदली-बढतीचे योग दिसू लागतील. आगामी एक दीड महिन्यात तरी साडेसातीची बाधा यत्किंचितही होणार नाही.

दि. १२ ते १४ जून प्रयत्नांची शिकस्त करून नेत्रदीपक यश मिळवाल.

**वृषभ :** मंगळासारखा स्फोटक ग्रह तुमच्या राशीतून पसार होत आहे; यातच आपण अर्धी अधिक लढाई जिंकलीत. आता उद्वेग, नैराश्य, अपेक्षाभंग हे सारे आपण विसरू शकता.

व्यावसायिक कामे गती घेऊ लागतील, भंगलेल्या आशाआकांक्षा बऱ्याच प्रमाणांत सांधल्या जातील. सांपत्तिक समस्या सुटू लागतील. नव्या आशा अंकुरायला लागतील. प्रगतीचे आजवर न सुटलेले गणित आता निश्चितच सुटू शकेल.

प्रत्यक्ष सांपत्तिक लाभ जरी फारसा झाला नाही तरी भविष्यकालीन लाभदायक घटना या कालीच अंकुरायला लागतील. वाढत्या खर्चाला पायबंद घालण्यात यशस्वी व्हाल.

दि. १२ ते १४ जून या कालीच सर्वत्र आशादायक वातावरण दिसू लागेल.

**मिथुन :** या वेळची अंतरिक्षीय ग्रहस्थिती अपेक्षेप्रमाणे अनुकूल नसली तरी प्रयत्नाला साद घालणारी मनोवृत्ती तुमच्या ठिकाणी असल्यामुळे, तुम्ही कोणत्याही क्षेत्रात अपेक्षित यश मिळवू शकाल. पण धावपळ, घडपड खूपच करावी लागेल. सूर्य-मंगळांचे संचलन तुमच्या राशीतूनच होणार असल्यामुळे, सहजपणे काही घडून येण्याची आशाच नको.

काही काही वेळा मन त्रस्त व संतप्त बनेल, नोकराचाकरांशी–वरिष्ठांशीही मधून मधून खटकू लागेल.

वृत्तपत्र–ग्रंथप्रकाशन, या क्षेत्रांमधील व्यक्तींना हे दिवस निश्चित धवधवीत यशाचे जाणवतील. राजकीय क्षेत्राशी फारसा संबंध ठेवणे योग्य ठरणार नाही.

दि. ९,१०,१३ जून या काली अनेक कामे यशस्वी व्हावीत.

**कर्क :** सध्याच्या रवि-मंगळांच्या हालचाली तुमच्या प्रगतीला पायबंद घालणाऱ्या आहेत असं मला मोठ्या नाइलाजाने म्हणावे लागत आहे.

व्ययस्थानी रवि-मंगळ येताच सारी कामे गतिशून्य बनू लागतात आणि विरोधकांना या तुमच्या अनिष्ट कालाचा फायदा उठवायला संधी लाभते. प्रत्यक्षात तसं काही घडलं नाही तरी हे दिवस व्यथा-विवंचना वाढविणारे जाणवतील.

प्राप्ती घटेल, खर्च मात्र सहस्रमुखाने वाढू लागेल. हार्दिक सहकार्य लाभण्याची शक्यता वाटेनाशी होईल. अगदी भरवशाची माणसेही ऐनवेळी दगा देतील.

यांत्रिक, वैद्यकीय क्षेत्रांतील व्यक्तींनी आगामी महिन्याभरात प्रत्येक गोष्ट फारच सावधपणे करायला हवी. दि. १०,१३,१४ जून या काली अपेक्षित यश लाभले.

**सिंह :** तुमच्या जीवनाची जडणघडण सूर्य-मंगळच करीत असतात. आणि या आठवड्यापासून ते तुमच्या लाभस्थानी येणार असल्यामुळे इतका अनुकूल काल यापूर्वी आपण क्वचितच अनुभवलेला असेल.

राजकीय क्षेत्रात तुमचा भाव वधारेल. सामाजिक क्षेत्रात तर तुमच्याविना पान हालेनासे होईल. अंगीकृत व्यवसाय-धंदा इतका सुधारेल की, अनेकांनी तुमचा हेवा करावा.

पण लक्षात ठेवा — अत्युच्च पदी थोरही बिघडतो. विचारांची कक्षा वाढवा. नम्रता सहनशीलता सतत धारण करा. एवढी पथ्ये पाळलीत तर याच्याइतका सर्वांगीण विकासाचा काल हाच. अनपेक्षितपणे धनलाभही या कालात व्हावा.

दि. ११ ते १४ जून या कालावर सारे लक्ष केंद्रित करा.

**कन्या :** आज सूर्य-मंगळ आपल्या भाग्यात आहेत. लवकरच ते आपल्या दशमस्थानी प्रवेश करतील. समर्थ ग्रहांचे एवढे सहकार्य लाभल्यावर आणखी काय हवे ?

तुमच्या कर्तृत्वाची कक्षा विस्तारू लागेल. उद्योगधंद्यात स्वीकारलेले नवे तंत्र यशस्वी ठरू लागेल. आगामी १५–२० दिवसांत उच्चाधिकार लाभण्याची लक्षणे स्पष्टपणे दिसू लागतील.

सध्याचे सारे दिवस खूपच धावपळीचे जाणवू लागतील. अनेक कामे रात्रीचा दिवस करून निपटून काढावी लागतील.

वैचारिक संघर्ष मिटेल. अपेक्षित यश निश्चित मिळू लागल.

दि. १०,१२,१४ जून अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल.

तूळ : सूर्य–मंगळ तुमच्या अष्टमातून लवकरच पसार होणार आहेत. ते तेथून गेले की, तुमच्या साऱ्या व्यथा-विवंचना मिटून जातील.

भाग्यस्थानातील त्यांचे संकलन तुम्हांला कोटकल्याणाचे ठरेल. दूरच्या प्रवासाचे प्रस्थान आताच काढून ठेवा. नोकरीधंद्यासाठी अनपेक्षितपणे स्थानान्तर घडेल. सांपत्तिक पेचप्रसंग सुटतील. उद्योगधंद्यातील नैराश्य मावळेल. भव्य योजना आकार घेऊ लागतील. धनिकांचे साहाय्य कोणत्याही क्षणी लाभेल.

आता तुम्हाला अकराव्या गुरूचे सामर्थ्य प्रत्ययाला यायला लागेल. आजवरचे सारे प्रयत्न कारणी लागतील. नवे स्नेहसंबंध जुळून येतील.

दि. १२ ते १४ जून या कालापासून सारे व्यवहार सुरळीत होऊ लागतील.

वृश्चिक : प्रयत्नांची शिकस्त करूनही अपेक्षेप्रमाणे यश जेव्हा मिळेनासे होते तेव्हा अभावितपणे असे उद्‌गार निघतात की, अनिष्ट ग्रहदशा असल्यामुळे असे होत असावे.

सध्या आपली अशीच ग्रहस्थिती आहे. रवि-मंगळ सप्तमातून अष्टमस्थानी प्रवेश करीत आहेत. ते आपल्या अंगीकृत कार्यात अनेक विघ्ने आणू लागतील. प्रकृती, मनःस्थितीवर आघात करू लागतील, इष्टमित्रांची मने कलुषित करू लागतील, अशा वेळी काही दिव जपून वागणेच हितावह ठरते. व्यापार-धंद्यातील साहस अंगाशी येईल, नोकरीचाकरीतील गाफीलपणा पश्चात्तापाला कारण ठरेल.

या वेळी मुख्यतः अधिक काळजी घ्या प्रकृतीची.

दि. १२ ते १४ जून सर्वसाधारण बरा काल.

धनू : गुरु-मंगळांच्या कृपेने आजवर सुखस्वास्थ्य अनुभवले. आता थोडा वेगळा काळ अनुभवावा लागणार आहे. ११ जूनला मंगळ सप्तमस्थानी प्रवेश करताच अनेक चमत्कारिक प्रसंगांना आपणास तोंड द्यावे लागणार आहे. चौथ्या शनीने आधीच आपले वातावरण दूषित केलेले आहे, अशा अवस्थेत मंगळाच्या अनिष्टतेची आणखीन भर.


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.

स्वास्थ्य हरवल्यासारखे वाटेल, भागीदारीचे व्यवहार चिघळू लागतील, औद्योगिक मंदीमुळे मन अस्वस्थ बनू लागेल. राजकीय क्षेत्रातील व्यक्तींनी तर या वेळी सरळ सरळ माघार घ्यावी हे बरे.

दि. १२–१३ जून काहीसे अनुकूल दिवस.

**मकर :** अन्य ग्रहांबरोबरच सूर्य–मंगळांचेही आपणास सहकार्य लाभणार असल्यामुळे तुमच्या प्रगतीला आणखीन वेग येईल.

षष्ठातील मंगळ विरोधकांना ठोकरून काढण्यात पटाईत असतो आणि हुकलेल्या संधी परत मिळवून देण्यात तत्पर असतो. या वेळी खर्च अफाट वाढेल पण अनेकांचे साहाय्यही भरपूर मिळेल.

स्थावराची समस्या सुटेल, नव्या व्यवसाय-धंद्याचे स्वप्न आकार घेऊ लागेल, वैचारिक दिलजमाई झाल्यामुळ आता तुमचा प्रगतीचा मार्ग कोणाकडूनही रोखला जाणार नाही.

दि. ११, १३, १४ जून अपेक्षित यश लाभावे.

**कुंभ :** चौथ्या रवि–मंगळांची डोकेदुखी आता थांबेल. गेल्या दोन महिन्यांत तुम्ही आपले स्वास्थ्य हरवून बसला होता. आता ते निश्चित गवसेल.

या आठवड्यात असंख्य कामाचे डोंगर उपसावे लागतील, भव्य योजना यशस्वी करण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल.

अधिकाराचे स्थान निश्चित लाभेल, वाहनाची विवंचना मिटेल, कौटुंबिक अनारोग्य मावळेल.

शिक्षणात घवघवीत यश लाभेल, वृत्तपत्रीय प्रसिद्धीही लाभावी.

दि. १०, १२, १४ जून विशष अनुकूल दिवस.

**मीन :** मंगळ चौथा होत आहे. शनीच्या जाचात मंगळाच्या छळवादाची भर. मोठा चमत्कारिक काल अनुभवावा लागणार आहे. परिस्थिती हातावेगळी जाणार नाही, यासाठी सतत दक्ष राहावे लागेल.

या काली आरोग्य बिघडेल, राहत्या जागेची विवंचना वाढीस लागेल, प्राप्ती घटेल, खर्च मात्र अनंतपटीने वाढू लागेल.

हाती घेतलेली कामे गतिशून्य बनू लागल्यामुळे, प्रतिष्ठा धोक्यात येईल की काय अशी भीती वाटू लागेल. वरिष्ठ नाराज बनतील. सहकारी रुष्ट बनतील. या वेळी संयम, निष्ठा यांचाच आपणास खरा आधार लाभेल.

दि. १२ ते १४ जून काहीसे बरे दिवस.

○

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649

# राज्यसभेत अन्नस्वतंत्रता ....

" देशातील शेतीचा व्हावा तसा विकास होत नसून ती अद्यापही दुबळी आहे. तिचा विकास खुरटण्याचे कारण म्हणजे अमेरिकेकडून येणारी धान्यमदत होय " असे परखड उद्गार महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष खासदार श्री. गुलाबराव पाटील यांनी राज्यसभेत अंदाजपत्रकावरील चर्चेत भाग घेताना काढले. ( एप्रिल १९६८ )

ते पुढे असेही म्हणाले की, परदेशी धान्य आयात करून ३ दशलक्ष टन धान्याचा बफर स्टॉक ठेवण्याचे धोरण सर्वथैव चूक आहे. चालू वर्षी अपेक्षिलेले भरपूर पीक केवळ लहरी पावसाची कृपा नसून परिश्रमाचे ते फळ आहे. शेतकऱ्यांमध्ये पाणीपुरवठा करण्याची, नवीन संकरित बियाणे वापरण्याची प्रवृत्ती वाढत आहे व अशा शेतकऱ्यांना अधिक उत्तेजन मिळणे आवश्यक आहे.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९, नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**